47 वा
वार्षिक अहवाल

# SMAK
## शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असो., कोल्हापूर

प्लॉट नं. पी-५९, स्मॅक भवन, एमआयडीसी, शिरोली, कोल्हापूर.

smakkop@gmail.com www.smakkolhapur.org

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव




## 'स्मॅक'ने घेतला आहे एकच ध्यास,
## निर्यातीने करूया सर्वांगीण विकास...!

SMAK
SHIROLI MANUFACTURERS ASSOCIATION, KOLHAPUR

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर

# संचालक मंडळ



**श्री. दीपक पाटील**
अध्यक्ष



**श्री. एम. वाय. पाटील**
उपाध्यक्ष



**श्री. श्यामसुंदर तोतला**
ऑ. सेक्रेटरी



**श्री. जयदीप चौगले**
ट्रेझरर



**श्री. राजू पाटील**
चेअरमन, स्मॅक आय.टी.आय.



**श्री. नीरज झंवर**
चेअरमन, स्मॅक फाउंड्री क्लस्टर



**श्री. अमर जाधव**
चेअरमन, स्किल ट्रेड प्रमोशन कमिटी



**श्री. सचिन पाटील**
चेअरमन, कोल्हापूर फाउंड्री क्लस्टर



**श्री. सुरेंद्र जैन**



**श्री. अतुल पाटील**



**श्री. प्रशांत शेळके**



**श्री. जयदत्त जोशीलकर**



**श्री. भरत जाधव**
संचालक



**श्री. सोहन शिरगावकर**
स्वीकृत संचालक



**श्री. रवी डोली**
स्वीकृत संचालक

उद्योग व व्यापार करण्याचे साहस जर आपण केले नाही, तर आपल्या सर्व चळवळी निस्तेज होतील...!

– राजर्षी छत्रपती शाहू महाराज



लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृति–शताब्दी

१९२२–२०२२

वंदन लोकराजाला

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज

# कृतज्ञता पर्व

४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

◆

## सभेचा तपशील

◆

**बुधवार दिनांक २१/१२/२०२२ रोजी**

◆

**दु. ४ ते सायं. ५ वाजेपर्यंत**
४७वी वार्षिक सर्वसाधारण सभा


◆

**सायं. ५ ते ५.१५ :** चहापान

◆

**सायं. ५.३० ते ७.०० :**
पुरस्कार वितरण व व्याख्यान

◆



**प्रमुख पाहुणे**
**श्री. यशवंत शंकरराव थोरात,**
माजी अध्यक्ष नाबार्ड,
(१०व्या व ११व्या पंचवार्षिक योजनेच्या प्लॅनिंग कमिशनमध्ये सहभाग)
यांचे
*'Business Lessons'*
या विषयावर व्याख्यान

◆

कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर सर्व सभासद व निमंत्रित मान्यवरांनी **स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा.**
**सायं. ८.०० ते १०.००**

SMAK
SHIROLI MANUFACTURERS ASSOCIATION, KOLHAPUR

# शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर

पी-५९, स्मॅक भवन, एमआयडीसी, शिरोली, कोल्हापूर

# सस्नेह निमंत्रण...

*मान्यवर सदस्य,*

*शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर 'स्मॅक' या संस्थेची* ***४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा,*** ***बुधवार दिनांक २१/१२/२०२२ रोजी दुपारी ठीक ४ वाजता*** *श्री रामप्रताप झंवर सभागृह, 'स्मॅक' भवन, एमआयडीसी, शिरोली येथे बोलविणेत आली आहे.*

*वार्षिक सभेनंतर चहापान झाल्यानंतर विविध मान्यवरांना* ***पुरस्कार वितरणाचा*** *कार्यक्रम होईल.*

*या सोहळ्याचे* ***प्रमुख पाहुणे, श्री. यशवंत शंकरराव थोरात, माजी अध्यक्ष नाबार्ड*** *यांचे 'Business Lessons' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.*

*तरी सर्व सभासद बंधूंनी या दोन्ही सोहळ्यास अगत्यपूर्वक उपस्थित रहावे ही नम्र विनंती.*

## आपले स्नेहांकित ....................................................

- **दीपक पाटील,** अध्यक्ष
- **एम. वाय. पाटील,** उपाध्यक्ष
- **जयदीप चौगले** खजानिस
- **श्यामसुंदर तोतला** ऑन. सेक्रेटरी
- **राजू पाटील** चेअरमन, स्मॅक आयटीआय
- **नीरज झंवर** चेअरमन सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट
- **अमर जाधव** चेअरमन, स्किल ट्रेड प्रमोशन कमिटी
- **सचिन पाटील** चेअरमन, फाँड्री अँड इंजि; क्लस्टर

संचालक ..........................................................

- **सुरेंद्र जैन**
- **अतुल पाटील**
- **प्रशांत शेळके**
- **जयदत्त जोशिलकर**
- **भरत जाधव**
- **सोहन शिरगावकर**
- **रवी डोली**

सं. क्र. नं. ४६/२०३४/२०२२

दिनांक : ०१/१२/२०२२

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर या संस्थेची ४७वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक २१/१२/२०२२ रोजी सायंकाळी ठीक ४:०० वाजता स्मॅक भवन, श्री रामप्रताप झंवर सभागृह, पी–५९, एम.आय.डी.सी., शिरोली येथे बोलविण्यात आलेली आहे. तरी कृपया आपण सभेला उपस्थित रहावे ही विनंती. सभेतील कामकाजाची विषयसूची खालीलप्रमाणे आहे.

## विषयसूची

१. दि. १७/१०/२०२१ रोजी झालेल्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

२. कार्यकारिणीने शिफारस केलेल्या सन २०२१–२२ सालचा अहवाल, जमा–खर्च व ताळेबंदास मंजुरी देणे.

३. कार्यकारिणीने शिफारस केलेल्या सन २०२२–२३ सालच्या अंदाजपत्रकास व अहवाल सालात झालेल्या ज्यादा खर्चास मंजुरी देणे.

४. सन २०२२–२३ सालाकरिता ऑडिटरची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.

५. मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या सभासदांनी सुचविलेल्या विषयांवर चर्चा करणे.

(कार्यकारी मंडळाच्या हुकूमावरून)

**एम. वाय. पाटील**
उपाध्यक्ष

**दीपक पाटील**
अध्यक्ष

### सूचना :

- गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी व त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर भरेल व त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
- ज्या सभासदांना वार्षिक कार्यवृत्तांत, जमा–खर्च, ताळेबंद, अंदाजपत्रक यांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. १३/१२/२०२२ पूर्वी लेखी कळवावे.
- कृपया सभेस येताना हा अहवाल आणावा.

**D. Y. Bhumkar & Co.**
**Chartered Accountants,**
Jai Dhaval, Laxmipuri, Kolhapur - 416002

# तपासणी दाखला

**प्रति,**
**मा. सभासद बंधू–भगिनी, शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर**

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर या संस्थेच्या जमा–खर्चाच्या पुस्तकांवरून दिनांक १/४/२०२१ ते ३१/३/२०२२ या कालावधीचे लेखापरीक्षण आम्ही केलेले असून, आमच्या अलाहिदा दिलेल्या अहवालातील शेऱ्यास पात्र राहून दाखला देतो की,

१. सोबत जोडलेले हिशेबी ताळेबंद पत्रक आणि उत्पन्न व खर्चपत्रक संस्थेच्या हिशेबी पुस्तकांशी जुळत आहेत.

२. आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व खुलाशावरून

अ) सोबत जोडलेले ताळेबंद पत्रक, संस्थेच्या दिनांक ३१/३/२०२२ अखेरच्या आर्थिक परिस्थितीची व

ब) सोबत जोडलेले उत्पन्न व खर्चपत्रक दिनांक ३१/३/२०२२ अखेर संपणाऱ्या वर्षाच्या उत्पन्नाची स्थिती दर्शवत आहे.

स्थळ : कोल्हापूर
**दिनांक : २८/०९/२०२२**

**डी. वाय. भूमकर आणि कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट्स



**श्री. दीपक पाटील**

## अध्यक्ष

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर

# मनोगत

सर्व सन्माननीय सभासद बंधू, भगिनी, संचालक, स्वीकृत संचालक व निमंत्रित सदस्य आपण सर्वांनी सहभागी होऊन केलेल्या कार्याचा शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर (स्मॅक) या संस्थेचा ४७वा वार्षिक आढावा सादर करीत आहे.

३१ ऑक्टोबर २०२१ रोजी माझी 'स्मॅक'च्या अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल मी सर्व संचालकांचा सदैव ऋणी आहे. यापूर्वी 'स्मॅक आयटीआय' चेअरमनपदी व 'स्मॅक'च्या उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी मला लाभली होती. उद्योजकांच्या तक्रारी व समस्या विविध मंचावर आयोजित बैठकींमधून मी व माझे सहकारी श्री. एम. वाय. पाटील यांनी मांडल्या. औद्योगिक वसाहतीमधील पाणी, वीज, स्ट्रीट लाईट, कचरा डेपो, सेवा दवाखाना, नालेसफाई यांसारख्या प्रश्नांचा नेहमीच पाठपुरावा केला.

सभासदांच्या अडचणी सोडविण्याकरिता स्मॅक भवनमध्ये विविध बैठकींचे आयोजन करण्यात आले. प्रामुख्याने शिये व टोप ग्रामपंचायतींच्या मालमत्ता कराबाबतचा महत्त्वाचा विषय मार्गी लावला, तसेच वीजपुरवठ्याबाबत उद्योजकांच्या तक्रारी 'महावितरण'कडे तत्काळ पोहोचण्याकरिता व त्यांच्या सूचना उद्योजकांना त्वरित प्राप्त होण्याकरिता पहिल्यांदाच फिडरवाईज बावीस व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आले. याद्वारे वीज बंदचे शेड्युलही उद्योजकांना दिले जाते. शिरोली एमआयडीसी महावितरण कार्यालयात सहाय्यक अभियंत्यांची नियुक्ती करण्यासाठी पाठपुरावा केला. अनेक महिने अतिरिक्त सहाय्यक अभियंता यांच्याकडे हा कार्यभार होता. सातत्याने वीज दरवाढ करणे थांबवावे, सलग तीन वर्षे वीजदरात वाढ करू नये, 'महावितरण'ने कार्यक्षमता वाढवून रास्त दरात वीज उपलब्ध करून द्यावी, इंधन समायोजन आकाराची अचूक तपासणी करावी, अखंडित वीजपुरवठा करावा या मागण्यांसाठी सर्व औद्योगिक संघटनांच्या माध्यमातून महावितरण कार्यालयावर मोर्चा काढला. सर्व सभासदांना त्यांच्या कामात सुलभता येण्यासाठी, त्यांना अद्ययावत माहिती मिळण्यासाठी 'स्मॅक' व 'आयआयएफ' यांच्या संयुक्त विद्यमाने नामवंत व्याख्यात्यांच्या चार विविध विषयांवर कार्यशाळा स्मॅक भवनमध्ये आयोजित केल्या गेल्या.

उद्योजकांना उद्योगविषयक माहिती तत्काळ मिळावी याकरिता संबंधित खात्याचे जीआर, सर्क्युलर, आदेश, नोटीस, माहिती व्हॉट्सॲप व ई-मेलद्वारे पाठविण्यात येते.

'स्मॅक'द्वारा प्रथमच कार्यान्वित स्मॅक एक्स्पोर्ट प्रमोशन (एसईपी) हा देशातील पहिला पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाला. 'एसईपी'च्या सदस्यांनी बर्मिंगहॅम (इंग्लंड), टान्झानिया (दक्षिण आफ्रिका) व म्युनिक (जर्मनी) येथे आयोजित आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये सहभाग नोंदविला व 'स्मॅक इंडिया पॅव्हेलियन' नावाने एकाच स्टॉलमधून सर्वांची उत्पादने प्रदर्शित केली. निर्यातीसाठी क्लस्टरच्या माध्यमातून केलेला हा पहिलाच प्रकल्प स्मॅक स्किल ट्रेड प्रमोशन कमिटीचे चेअरमन, माझे सहकारी अमर जाधव यांनी एमएसएमईंना एकजूट करून 'स्मॅक'ची पताका आंतरराष्ट्रीय क्षितिजावर फडकवली.

कृतज्ञता पर्वांतर्गत जिल्ह्यात पहिल्यांदाच आयोजित स्टार्टअप इनोव्हेशन फेस्टिव्हलमध्ये स्मॅक आणि मयूरा ग्रुपने उद्योगाचा एक घटक म्हणून लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांप्रती विनम्र आदरांजली अर्पण करण्याकरिता प्रायोजकत्व स्वीकारले. 'हर घर तिरंगा' उपक्रम यशस्वीपणे राबविला. वृक्षारोपण उपक्रमांतर्गत श्रीराम फौंड्री ते स्मॅक भवन ही ई लेन सुशोभित करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवडीसाठी सरोज ग्रुपने योगदान दिले. स्मॅक भवनला विविध मान्यवरांनी भेट दिली. यामध्ये प्रामुख्याने माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, एमआयडीसीचे जॉईंट सीईओ, एमएसएमई, एक्स्पोर्ट-इम्पोर्ट बँकेचे अधिकारी यांचा समावेश होता.

आपल्या 'स्मॅक आयटीआय'ला ३ ऑगस्ट २०२२ रोजी महाराष्ट्र शासनाकडून पुणे विभागामधून 'उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था' हा पुरस्कार जाहीर झाला. आयटीआय चेअरमन श्री. राजू पाटील व ट्रेनिंग कमिटी या सर्वांनी आपला अमूल्य वेळ देऊन विविध संकल्पनांतून आयटीआयचे नाव आणखी उंचावले आहे.

२०१९ मध्ये आपण 'स्मॅक'च्या नवीन इमारतीचे बांधकाम हाती घेतले होते. आज २०२२ मध्ये ही इमारत पूर्णत्वास आली आहे. ही इमारत पूर्ण करण्यामध्ये 'स्मॅक आयटीआय'चे चेअरमन श्री. राजू पाटील यांचे मोठे योगदान लाभले आहे. 'स्मॅक'द्वारा केलेल्या कार्याचा आढावा आपल्या अवलोकनार्थ पुढे या अहवालामध्ये विस्तृतपणे फोटोसह स्वतंत्रपणे प्रस्तुत केला आहे. उद्योगांविषयीचे प्रश्न मार्गी लावण्याकरिता जिल्हाधिकारीसो, तसेच जिल्हा उद्योग केंद्र, एमआयडीसी, महावितरण व अन्य शासकीय कार्यालयांच्या अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून प्रयत्न केले. या सर्वांचा मी आभारी आहे. कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन, गोशिमा, मॅक, आयआयएफ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स, कोल्हापूर उद्यम सोसायटी, स्लिमा, सीआयआय पश्चिम विभागाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी व सर्व संचालक मंडळाचे बहुमोल सहकार्य लाभले.

प्रिंट, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रतिनिधी, ज्ञात-अज्ञात लोकांनी केलेल्या सहकार्याबद्दल या सर्वांचे मी आभार व्यक्त करतो. नजरचुकीने कोणाचे नाव, शासकीय विभागाचा उल्लेख करावयाचा राहिल्यास क्षमस्व.

आपण सर्वांनी या संस्थेचे नेतृत्व करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवलीत. ती जबाबदारी सर्व पदाधिकारी व संचालकांच्या सहकार्याने जबाबदारीने पार पाडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. पुनश्च एकदा सर्वांचे आभार व धन्यवाद! आपण सर्वांनी वार्षिक सभेस आवर्जून उपस्थित रहावे...



**श्री. एम. वाय. पाटील**

## उपाध्यक्ष

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर

# मनोगत

**मान्यवर सभासद बंधू-भगिनींनो, सस्नेह नमस्कार**

शिरोली औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या आर्थिक आणि सामाजिक कार्यरत 'स्मॅक'च्या उपाध्यक्षपदी कार्य करायची संधी दिल्याबद्दल आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. याअगोदर ट्रेझररपदाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली होती. 'स्मॅक'चे संचालक, स्वीकृत संचालक व निमंत्रित सदस्य यांच्या सहकार्याने 'स्मॅक'च्या अनेक कार्यात मी उपाध्यक्ष या नात्याने सक्रिय सहभाग घेऊन कामकाज केले.

२०२१-२२ चा ४७ वा वार्षिक अहवाल, ऑडिट रिपोर्ट, ताळेबंद पत्रक, उत्पन्न खर्च पत्रक आम्ही आपल्यासमोर मंजुरीसाठी सादर केले आहे. संस्थेचे आर्थिक स्थैर्य उत्तम आहे.

'स्मॅक'चे अध्यक्ष श्री. दीपक पाटील यांनी त्यांच्या मनोगतामध्ये सर्व प्रमुख कामांचा आढावा घेतला आहे. असोसिएशनचे सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे सदस्यांचे प्रश्न, समस्या सोडविण्यात सहाय्यभूत होणे, उद्योगविषयक तसेच शासकीय योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवणे हे होय. यास अनुसरून स्मॅक भवनमध्ये विविध शासकीय खात्यांचे सेमिनार्स, विविध विषयांवर प्रमुख व्याख्यात्यांच्या कार्यशाळा आयोजित करून सभासदांना माहिती देण्यात आली, तसेच शासकीय उपक्रमांची माहिती सभासदांपर्यंत पोहोचविण्यात आली आणि त्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पाठपुरावा केला गेला. यामध्ये प्रामुख्याने क्लीन एमआयडीसी अभियान, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्व, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा' उपक्रम व वृक्षारोपण उपक्रमाचा समावेश आहे.

सभासदांचे प्रश्न, समस्या मांडण्याकरिता विविध बैठका, कार्यक्रमांमध्ये मला सहभागी होऊन 'स्मॅक'चे प्रतिनिधित्व करता आले. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा उद्योग केंद्रद्वारा जिल्हाधिकारीसाो यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या उद्योगमित्र बैठकांमधून सभासदांच्या अडचणी व तक्रारी मांडता आल्या. मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चर या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या कोल्हापूर दौऱ्यावेळी ग्रामपंचायतीचा मालमत्ता कर, वीजदर, पीएसआय अनुदान इत्यादी विषयांवर चर्चा करता आली. उद्योगविषयक सर्व औद्योगिक संघटनांच्या विविध बैठकांमध्ये उपस्थित राहता आले. वीजविषयक तक्रारींबाबत बैठकीमध्ये प्रतिनिधित्व केले. लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कृतज्ञता पर्वांतर्गत प्रशासनाद्वारा आयोजित लोकराजा स्टार्टअप व इनोव्हेशन फेस्टिव्हल २०२२च्या उद्घाटन समारंभप्रसंगी मनोगत व्यक्त करण्याची संधी मिळाली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हीरकमहोत्सवी वर्धापनदिन सोहळा व जीएसटी विभागाद्वारा एक जुलै रोजी आयोजित जीएसटी दिवस समारंभामध्ये उपस्थित राहिलो.

'स्मॅक'ची वेबसाईट अद्ययावत करण्यात आली आहे. यामध्ये, स्मॅक एक्स्पोर्ट प्रमोशन हे नवीन सदर समाविष्ट करण्यात आले आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने स्मॅक एक्स्पोर्ट ग्रुपअंतर्गत शिरोली औद्योगिक क्षेत्रामधील फेरस, नॉनफेरस, स्टील आणि अलॉय कास्टिंग, मशीनिंग, प्रॉडक्ट व फॅब्रिकेशनमध्ये कार्यरत एमएसएमई उद्योगांची माहिती एका क्लिकद्वारे आपल्याला मिळते.

'स्मॅक'द्वारा उद्योगाशी निगडित विविध मान्यवरांच्या निवडी, नियुक्त्या आणि उपलब्धीबद्दल त्यांचा संचालक मंडळाच्या बैठकांमध्ये सत्कार करण्यात आले.

लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी कार्यालय, सार्वजनिक न्यास कार्यालय, शिवाजी विद्यापीठ, विविध शासकीय कार्यालय, शिरोली एमआयडीसी पोलिस ठाणे, आयकर, जीएसटी, कर्मचारी भविष्य निधी संघटना, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत शिरोली पुलाची, शिये, टोप, नागाव, कामगार विमा निगम (ईएसआयसी), प्राथमिक आरोग्य केंद्र शिरोली पुलाची, विविध बँकांमधील अधिकारी, कर्मचारी तसेच चार्टर्ड अकाऊंटंट, कायदेशीर सल्लागार, संस्थेकडील विविध खात्यांच्या सल्लागारांनी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल या सर्वांचे आभार मानतो.

'स्मॅक'च्या सदस्यांच्या संयुक्त बांधिलकीमुळे सर्व अडथळ्यांवर सहजतेने मात करणे शक्य झाले. त्यांच्याकडून मिळालेले अखंड सहकार्य आणि समर्थनासाठी मी त्यांचा ऋणी आहे. आपले उद्योजक आमदार चंद्रकांत जाधव, भारतरत्न लता मंगेशकर, उद्योगपती राहुल बजाज, प्रा. एन. डी. पाटील, तसेच संस्थेचे काही सभासद, उद्योजक, हितचिंतक, काही थोर व्यक्तींचे दुःखद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

संचालक मंडळाच्या नियमित मासिक सभेमध्ये व तातडीच्या बैठकांमध्ये निर्णय प्रक्रियेमध्ये संचालकांनी घेतलेल्या सहभागामुळे मदत झाली. विशेष करून शिरोली औद्योगिक क्षेत्रातील लघुउद्योजकांसाठी ग्रुप अॅक्टिव्हिटीअंतर्गत निर्यात क्षेत्रात माझे सहकारी श्री. अमर जाधव व एसईपीच्या सर्व सदस्यांनी 'स्मॅक'चा हा अभिनव प्रकल्प काही कालावधीतच यशस्वी करून दाखविला. क्लस्टरअंतर्गत या प्रकल्पात आपला व्यवसाय सांभाळत एकदिलाने आणि एकजुटीने एकमेकांसाठी कार्य करीत आहेत.

माझ्या मनोगतास विराम देण्यापूर्वी या सर्वांनी असोसिएशनच्या कार्यात सहभाग घेतल्याबद्दल मी त्यांचे आभार मानू इच्छितो. क्लस्टर, आयटीआय, 'स्मॅक'चा स्टाफ आणि सर्व संचालक, स्विकृत संचालक व निमंत्रित सदस्य यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे.



श्री. राजू पाटील

चेअरमन

स्मॅक आय.टी.आय.

# मनोगत

## ट्रेनिंग कमिटी



श्री. जयदीप चौगले



श्री. प्रशांत शेळके



श्री. भरत जाधव



श्री. सोहन शिरगावकर



श्री. रवी डोली



श्री. अविनाश चिकनीस



श्री. आय. ए. पाटील

**सर्व सन्माननीय सभासद बंधू व भगिनी,**

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर या संस्थेच्या ४७ व्या वार्षिक सभेच्या अहवालात स्मॅक ट्रेनिंग कमिटी अध्यक्ष म्हणून मनोगत व्यक्त करताना विशेष आनंद होत आहे. औद्योगिक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण उत्पादन ही महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी गरज असते ती कुशल मनुष्यबळाची आणि हे महत्त्वपूर्ण काम 'स्मॅक आयटीआय' अनेक वर्षांपासून करीत आहे.

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत मूलभूत प्रशिक्षण संस्थेची १९८० मध्ये सुरुवात झाली. संस्थेमध्ये फिटर, मशिनिस्ट ट्रेडची मान्यता असून, २०२१ पासून इलेक्ट्रिशियन ट्रेडला मान्यता घेण्यात आली आहे. प्रत्येक वर्षी एकूण ६० विद्यार्थी या योजनेंतर्गत भरले जातात. या प्रशिक्षण योजनेचे राज्य आणि केंद्र संचालनालय परिषदांनी कौतुक केले आहे.

शासनाच्या नवीन नियमानुसार सर्व आयटीआय (आस्थापना) सुरू ठेवायची झाल्यास ४ व्यवसाय, ८ तुकड्या त्यामध्ये किमान एक इंजिनिअरिंग, एक नॉनइंजिनिअरिंग आणि एक न्यू एज / इंडस्ट्री ४.० निवडणे अनिवार्य आहे. तसे न केल्यास संस्थेची मान्यता रद्द होते. त्याकरिता २०२२ पासून आयटीआयमध्ये शासनमान्य १ ते २ वर्षे मुदतीचे नवीन ४ कोर्सेस, १ टेक्निशियन मॅकेट्रॉनिक्स (न्यू एज), २ मेकॅनिकल मोटारव्हेईकल (इंजिनिअरिंग), ३ वायरमन (इंजिनिअरिंग नॉनमशीन), ४ हाऊसकीपर (नॉनइंजिनिअरिंग) यांच्या मान्यतेकरिता शासनाकडे अर्ज केला होता. अर्जास सकारात्मक अहवाल मिळाला आहे व त्याबाबतचे लेटर ऑफ इंटेंट (एलओआय) शासनाकडून लवकरच मिळेल.

सत्र २०२२ करिता आयटीआयमध्ये १२४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत, तसेच बीटीपीमध्ये ४७ विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले आहेत. शासन निर्णयाप्रमाणे आयटीआयमध्ये प्रवेश घेतलेल्या खुल्या प्रवर्ग सोडून इतर सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती ८० ते १०० टक्के या प्रमाणात मिळणार असून, २०२१-२२ वर्षामध्ये ६३ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप)चे प्रस्ताव मंजूर झाले आहेत.

संस्थेसाठी अभिमानाची आणि कौतुकाची बाब म्हणजे २०२०-२१ मध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'स्मॅक आयटीआय'ला राज्य शासनामार्फत 'उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार व नावीन्यता विभागाकडून पुणे विभागात (पाच जिल्ह्यांत) नोंद असणाऱ्या जवळपास ३७५ संस्थांमधून 'स्मॅक'ची 'बेस्ट आयटीआय' म्हणून निवड करण्यात आली आहे. यासाठी संस्थेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या खालील नावीन्यपूर्ण उपक्रम व मॉडेल्सची मदत झाली. त्यामध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग, वॉटर प्युरिफायरसाठी शेड, फ्लॅग पोलचे नूतनीकरण, पीव्हीसी पाईप फ्रेम, मेकॅनिकल रोबोट, ट्रान्समिशन ऑफ इलेक्ट्रिकल पॉवर, पॅरलल ऑपरेशन, रिव्हॉल्व्हिंग चेअर, टिल्टिंग टेबल फॉर ड्राफ्ट्समन मेकॅनिकलचा समावेश आहे.

कमिन्स इंडिया लि.बरोबर २०२० ते २०२३ पर्यंत ३ वर्षांकरिता सामंजस्य करार वाढविण्यात आला आहे, तसेच मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडिया लि. कंपनीबरोबरही पुढील ३ वर्षांकरिता करार वाढविण्यात आला आहे. त्याचबरोबर संस्था स्तरावरील सीएनसी ट्रेनिंग व व्हीएमसी मशीन कोर्स यशस्वीरीत्या चालवित आहोत. सीएनसी व व्हीएमसी प्रशिक्षणांतर्गत प्रत्येक तीन महिने २५ जणांना प्रशिक्षण देऊन त्यांना १०० टक्के नोकरीसुद्धा मिळवून दिली आहे.

उद्योजकांना आवाहन करू इच्छितो की, आपल्या कंपनीतील शिकाऊ उमेदवारी देण्यासाठी शासनाच्या एनएपीएस या पोर्टलवरती आपल्या कंपनीचे रजिस्ट्रेशन करून फ्रेशर / आयटीआय प्रशिक्षित विद्यार्थ्यांची नेमणूक करून महाराष्ट्र शासनाकडून दरमहा प्रतिविद्यार्थी रकमेचा परतावा व केंद्र शासनाकडून प्रतिविद्यार्थी १५०० रुपये परतावा रकमेचा लाभ घेण्यात यावा. त्याचबरोबर उद्योजकांनी त्यांच्या कंपनीतील कामगारांच्या पाल्यांना आयटीआय प्रवेशासाठी प्रोत्साहित करावे, हीदेखील विनंती.

आयटीआयकरिता बांधण्यात आलेल्या ९००० चौ. स्क्वे. फूट नवीन इमारतीचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. संस्थेमधील प्रवेशासाठीच्या मंजूर जागा नवीन ट्रेड मागणीमुळे वाढणार आहेत. त्याकरिता अनुभवी व उच्चशिक्षित व्यक्ती म्हणून श्री. डी. बी. पाठक यांची संस्थेच्या प्राचार्यपदी निवड करण्यात आली आहे.

२०२१ मधील प्रवेशित २१४ विद्यार्थ्यांना सेफ्टी शूज देण्यासाठी श्री. भरत जाधव, श्री. शामसुंदर तोतला, श्री. बदाम पाटील, श्री. भीमराव खाडे, श्री. अविनाश चिकनीस व श्री. एम. वाय. पाटील या उद्योजकांनी प्रायोजकत्व स्वीकारले. या सर्वांचे याबद्दल हार्दिक आभार.

आयटीआय चेअरमन म्हणून काम करीत असताना 'स्मॅक'चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, ऑन. सेक्रेटरी, ट्रेझरर, 'स्मॅक'चे सर्व संचालक, आयटीआयचे सर्व संचालक, प्राचार्य व स्टाफ यांचे बहुमोल सहकार्य लाभले त्याबद्दल धन्यवाद...



**श्री. नीरज झंवर**

## चेअरमन

सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट,
शिरोली कोल्हापूर फाउंड्री
अँड इंजिनिअरिंग क्लस्टर

# मनोगत

### शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लांट कमिटी



श्री. सचिन पाटील



श्री. राजू पाटील



श्री. सुरेंद्र जैन



श्री. अतुल पाटील



श्री. जयदत्त जोशीलकर



श्री. रविकुमार केलगिनमठ



श्री. प्रवीण पटेल

आज आपल्या शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर (स्मॅक) च्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अहवालामध्ये सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट (शिरोली)चा अध्यक्ष म्हणून मनोगत व्यक्त करताना मला फार आनंद होत आहे.

कोल्हापूर फाउंड्री अँड इंजिनिअरिंग क्लस्टर या योजनेतून शिरोली औद्योगिक वसाहतीकरिता मंजूर झालेल्या व यशस्वीपणे सुरू असलेल्या सॅण्ड रिक्लमेशन प्लान्टबाबतची सविस्तर माहिती आम्ही प्रत्येक अहवालांमध्ये वेळोवेळी देत आलेलो आहे. शिरोली औद्योगिक वसाहतीतील सॅण्ड रिक्लमेशन प्लान्टची घोडदौड सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या सुरू आहे. आजपर्यंत ७५ हजार मेट्रिक टनापेक्षाही जास्त सॅण्ड प्लान्टमधून रिक्लेम केली आहे व जवळपास ५० पेक्षा जास्त सभासद कंपन्यांना त्याचा फायदा झाला आहे.



शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्टने आय.एस.ओ. ९००१:२०१५ चे प्रमाणपत्र मिळवून यशाचे आणखी एक शिखर गाठले आहे. रॉ मटेरिअल, फिनिश प्रॉडक्ट यांचा सुयोग्य मेळ साधून सदरचा प्लान्ट हा २२०० ते २५०० मेट्रिक टनापर्यंत फिनिश प्रॉडक्ट डिस्पॅच करण्यात यशस्वी झाला आहे.

हा प्लान्ट आणखीन कार्यक्षम बनवून असाच यशस्वीरीत्या सुरू राहण्यासाठी आम्ही आणि शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट कमिटी मेंबर्स चालू वर्षी अनेक प्रकल्पांचे नियोजनही करीत आहोत, त्यामध्ये नॅचरल गॅसचा वापर या वर्षाच्या सप्टेंबर २०२२ पासून सुरू करीत आहोत, ज्यामुळे सध्या एलपीजीवर होणारा जास्तीचा खर्च कमी होऊन निव्वळ नफा वाढण्यास मदत होईल व त्यामुळे इतर संलग्न प्रकल्प सुरू करण्यास मदत होईल, जसे सोलर सिस्टिम, ऑटोमॅटिक सॅण्ड हॅन्डलिंग सिस्टिम वैगेरे. त्याचप्रमाणे सदरच्या प्लान्टची यशस्वी वाटचाल पाहता असाच आणखीन एक सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट आपल्या शिरोली औद्योगिक वसाहतीकरिता शासनाकडून मंजूर करण्याचेही प्रयत्न सुरू आहेत. आपल्या सर्वांच्या सहकार्याने असाच एक नवीन प्लान्ट लवकरात लवकर कार्यान्वित करू.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने खूप कमी वेळेत वेगवेगळ्या अडचणींवर मात करत आज सदरचा प्लान्ट हा सर्वोच्च ठिकाणी कार्यरत होताना दिसत आहे.

ज्येष्ठ उद्योगपती (कै.) मा. रामप्रतापजी झंवर साहेबांचे या प्लान्टबाबत जे स्वप्न होते, ते पूर्ण होताना दिसत असल्याने या गोष्टीचा एक विशेष आनंद होत आहे. कारण त्यांच्या पुढाकाराने क्लस्टरचा भक्कम पाया उभा राहिला आहे.

तसेच याच्या यशस्वी वाटचालीमध्ये कोल्हापूर फाउंड्री ॲण्ड इंजिनिअरिंग क्लस्टरचे अध्यक्ष श्री. सचिन पाटील यांचे व इतर सर्व संचालकांचेही वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले, त्याबद्दल त्यांचे आभार. आमच्या शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट कमिटी मेंबर्सकडून वेळोवेळी मिळणाऱ्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार. तसेच 'स्मॅक'चे अध्यक्ष, पदाधिकारी व सर्व संचालक मंडाळाचे जे काय बहुमूल्य सहकार्य लाभले, त्याबद्दल त्यांचेही आभार मी या मनोगताच्या निमित्ताने व्यक्त करतो...



**श्री. अमर जाधव**

चेअरमन

स्किल ट्रेड प्रमोशन कमिटी

# मनोगत

जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या भारतातील फाउंड्री उद्योगात कोल्हापूर ही प्रमुख प्रेरकशक्ती आहे. नेहमी पुढाकार घेऊन उद्योगांना नवीन मार्गांकडे घेऊन जाणे, ही त्याची प्रमुख भूमिका आहे.

शिरोली औद्योगिक परिसरात विविध एसएसआय आस्थापना आहेत. जसे की भारी ते मध्यम फाउंड्री (फेरस आणि नॉनफेरस), फोर्जिंग युनिट्स्, हायटेक मशीन शॉप्स, फॅब्रिकेशन आणि असेंब्ली युनिटस्, जे सध्या युरोप आणि यूएसएमधील देशांमध्ये निर्यात करीत आहेत.

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर, 'स्मॅक'ने शिरोली औद्योगिक क्षेत्रामधील उद्योजकांना निर्यातीविषयक अद्ययावत माहिती देऊन आंतरराष्ट्रीय व्यापारात त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी व प्रोत्साहित करण्यासाठी 'स्मॅक एक्स्पोर्ट प्रमोशन' (एसईपी) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू केला आहे. मला खूप आनंद होत आहे की, 'एसईपी'ची स्थापना सर्व सदस्यांना त्यांच्या उत्पादित वस्तूंची निर्यात करण्याच्या उद्देशाने एका समान व्यासपीठावर आणण्यासाठी करण्यात आली आहे. जास्तीत जास्त निर्यात करून आपल्या देशाला परकीय चलन मिळवून देणारा 'एसईपी' हा भारतातील पथदर्शी प्रकल्प आहे.

आमची दृष्टी (Vision) : 'एसईपी'चे ध्येय जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त स्मॅक अभियांत्रिकी निर्यात क्लस्टर विकसित करण्यासाठी त्यांच्या क्षमतांना आंतरराष्ट्रीय स्तरावर संघटित करून निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून इच्छित कौशल्यांसह कार्यशक्ती विकसित करून महत्त्वपूर्ण प्रभाव निर्माण करणे हे आहे.

आमचे ध्येय (Mission) : आमच्या 'एसईपी' सदस्य कंपन्यांसाठी जागतिक संधी व उत्पादनांसाठी बाजारपेठ उघडणे हे आमचे ध्येय आहे. 'स्मॅक'ने दोन वर्षांपूर्वी एमएसएमई लीन क्लस्टर प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे आणि तो यशस्वीरीत्या कार्यरत आहे. 'एसईपी'साठी शिरोली औद्योगिक क्षेत्रातील निवडक कुशल निर्यातक्षम १९ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आधारित कंपन्यांचा क्लस्टर तयार केला आहे, ज्या फेरस आणि नॉनफेरस कास्टिंग मॅन्युफॅक्चरिंग आणि मशिनिंग, स्टील आणि अलॉय कास्टिंग आणि मशिनिंग, मशिनिंग, उत्पादन आणि फॅब्रिकेशनमध्ये कार्यरत आहेत.

उत्पादनासाठी तसेच तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी आमचे सदस्य आणि परदेशी भागीदार यांच्यातील संयुक्त उपक्रमांमध्ये आम्हाला स्वारस्य आहे.

आम्ही काही आर्थिक खर्चाच्या गणना, स्वॉट विश्लेषणासह 'एसईपी'चे कामकाज सुरू केले. पुढची पायरी 'डीआयसी', 'ईईपीसी', 'डीजीएफटी', 'एमएसएमई'सारख्या संबंधित सरकारी संस्थांशी संपर्क साधला. निर्यातीसाठी आमची उत्सुकता पटवून देण्यात आम्ही यशस्वी झालो. ७ ते ८ महिन्यांच्या कालावधीत आम्ही परदेशात तीन आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये सहभाग घेतला.

भारत सरकारच्या 'स्ट्रॅटेजी फॉर न्यू इंडिया ७५' नुसार, आम्ही या धोरणात पहिल्या टप्प्यात किमान ७५ कोटींच्या निर्यातीचे योगदान देण्याचा मानस ठेवलेला आहे.

आम्ही नवीन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये निर्यात वाढवू, जेणेकरून राज्य आणि देशाचा महसूल वाढण्यास हातभार लागेल. मला खात्री आहे की, 'एसईपी' सदस्य एक समान उद्दिष्ट घेऊन एकत्र काम करतील, जेणेकरून उद्योगाला फायदा होईल. आम्ही 'एसईपी' सदस्यांना प्रशिक्षण, व्यवसाय बुद्धिमत्ता आणि संधी प्रदान करतो. आम्ही आशियाई आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिक भागीदारांचे नेटवर्क विविध प्रकारच्या चॅनेलद्वारे सुधारण्यासाठी मदत करतो.

थोडक्यात, आम्ही आमच्या सदस्यांना जोडण्यात आणि त्यांची व्यावसायिक उद्दिष्टे साध्य करण्यात यशस्वी होण्यास मदत करतो. आमचा दृष्टिकोन आम्हाला खात्री देतो की, आमच्या प्रयत्नांमुळे भारत आणि आशियाच्या जागतिक व्यापार केंद्राच्या भूमिकेला चालना मिळेल आणि राष्ट्र व व्यापक क्षेत्रासाठी दीर्घकालीन वाढीस मदत होईल. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय (एमएसएमई), नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएसआयसी), इंजिनिअरिंग एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल (ईईपीसी),डायरेक्टरेट जनरल ऑफ फॉरेन ट्रेड (डीजीएफटी), एक्स्पोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (ईसीजीसी) व जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) या प्रकल्पाला मदत करत आहेत.

एसईपी प्रकल्पाची विस्तृत माहिती www. smakkolhapr.org या आमच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. एसईपी प्रकल्पाच्या क्रियांवयनासाठी 'स्मॅक'चे पदाधिकारी, संचालक, स्वीकृत संचालक, निमंत्रित सदस्य, 'एमएसएमई', 'एनएसआयसी', 'ईईपीसी', 'डीजीएफटी', 'डीआयसी'चे अधिकारी, कर्मचारी, डिपार्टमेंट ऑफ इंटरनॅशनल ट्रेड प्रमोशन (डीआयटीपी), वाणिज्य मंत्रालय थायलंडचे व्यापार सल्लागार, बेकार्ट इंडस्ट्रीजचे संचालक, मरीमबा ऑटो एलएलसी, डेटराईट, मिशिगनचे भारतातील प्रतिनिधी, स्मॅक, 'एसईपी' सदस्य, अन्य ज्ञात-अज्ञात मान्यवरांच्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे धन्यवाद मानतो.



**श्री. सचिन पाटील**
चेअरमन
कोल्हापूर फाउंड्री अँड इंजिनिअरिंग क्लस्टर

# मनोगत

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर (स्मॅक)च्या ४७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अहवालामध्ये कोल्हापूर फाउंड्री अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग क्लस्टरचा अध्यक्ष म्हणून मनोगत व्यक्त करताना फार आनंद होत आहे. कोल्हापूर फाउंड्री अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर योजनेतून कोल्हापूर जिल्ह्यातील पाच वेगवेगळ्या औद्योगिक वसाहतींकरिता त्यांच्या औद्योगिक वसाहतींमधील गरजा लक्षात घेऊन प्रकल्प मंजूर झाले आहेत.

शिरोली औद्योगिक वसाहत व गोकुळ शिरगाव औद्योगिक वसाहतीकरिता सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट हा अत्यंत महत्त्वाचा असा प्रकल्प मंजूर झाला आहे. सदरचे दोन्ही प्लान्ट सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या सुरू आहेत.



शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्टचे रोजचे कामकाज सुरळीतपणे व्हावे, या अनुषंगाने 'स्मॅक'च्या वतीने शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट कमिटीची निवड केली.

सदर कमिटीमध्ये असलेले श्री. दीपक पाटील विद्यमान अध्यक्ष 'स्मॅक', श्री. एम. वाय पाटील विद्यमान उपाध्यक्ष 'स्मॅक', श्री. नीरज झंवर अध्यक्ष शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट व शिरोली सबक्लस्टरचे विद्यमान संचालक श्री. अतुल पाटील, शिरोली सबक्लस्टरचे विद्यमान संचालक तसेच श्री. सुरेंद्र जैन, श्री. राजू पाटील, श्री. जयदत्त जोशीलकर, श्री. प्रवीण पटेल व श्री. के. रविकुमार यांचे रोजच्या कामकाजामध्ये मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळत असल्याने शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लान्ट दिवसेंदिवस चांगली प्रगती करत असल्याचे पाहून शासनाने दिलेल्या निधीचा योग्य वापर झाल्याचे समाधान होते. त्याबद्दल या सर्व कमिटी मेंबर्सचे विशेष आभार.

सध्या रिक्लेम सॅण्डची मागणी वाढत असल्याने शिरोली सबक्लस्टर आणखी एका नव्या सॅण्ड रिक्लमेशन प्लान्टच्या तयारीत असल्याचे दिसून येते. त्यासाठी कोल्हापूर फाउंड्री अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग क्लस्टरकडून जी काय मदत लागेल, ती सर्वतोपरी आम्ही सर्व संचालक मिळून करू. त्याचबरोबर सध्याच्या प्लान्टमध्ये प्लान्टचे विद्यमान संचालक व कमिटी मेंबर्स आणखीन नावीन्यपूर्ण प्रकल्पाचे नियोजनही करीत आहेत, जसे सोलर सिस्टिम, ऑटोमेटिक सॅण्ड हँडलिंग सिस्टिम, अंतर्गत विकास ज्यामध्ये अंतर्गत रस्ते, गटरर्स, संरक्षक भिंत वगैरे याही कामासाठी कोल्हापूर फाउंड्री अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर सहकार्य करेल. थोडक्यात, सर्वांच्या सहकार्याने कोल्हापूर फाउंड्री अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर या प्रकल्पातून 'स्मॅक'साठी मंजूर झालेली कामे पूर्ण झाली आहेत. या सर्व कामांसाठी तसेच प्रकल्पामध्ये आलेल्या अडचणी सोडविण्याकरिता व प्रकल्प वेळेत सुरु करण्यासाठी (कै.) ज्येष्ठ उद्योगपती मा.श्री. रामप्रतापजी झंवरसाहेब, माजी अध्यक्ष कोल्हापूर फाउंड्री अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग क्लस्टर, श्री. प्रकाश राठोड, माजी संचालक क्लस्टर, श्री. नीरज झंवर संचालक क्लस्टर, श्री. अतुल पाटील संचालक क्लस्टर तसेच श्री. दीपक पाटील अध्यक्ष 'स्मॅक', श्री. एम. वाय. पाटील, उपाध्यक्ष 'स्मॅक' तसेच 'स्मॅक' व क्लस्टरचे सर्व संचालक, निमंत्रित संचालक, सभासद यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे.

कोल्हापूर फाउंड्री अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग क्लस्टरचे तत्कालीन संचालक (कै.) आमदार चंद्रकांत जाधव (आण्णा) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे १ डिसेंबर २०२१ रोजी निधन झाले, त्यांना क्लस्टरचे संचालक सदस्य यांच्या वतीने विनम्र आदरांजली.

या प्रकल्पातील आमचे उर्वरित सबक्लस्टर ल. क. आकिवाटे औद्योगिक सहकारी वसाहत लि., जयसिंगपूर, छत्रपती शाहू सहकारी औद्योगिक वसाहत लि., शिरोळ, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन, कोल्हापूर, गोकुळ शिरगाव मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, गोकुळ शिरगाव एम.आय.डी.सी. कोल्हापूर व आय.आय.एफ. कोल्हापूर यांचेही वेळोवेळी सहकार्य मिळाले, त्याबद्दल या सर्व सबक्लस्टरचे आभार.

त्याचबरोबर इतर संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, शासकीय अधिकारी, पत्रकारबंधू यांच्याही सहाकार्यबद्दल मी आभारी आहे...



विद्यार्थ्यांनी तयार केलेले ॲडजेस्टेबल ड्रॉइंग टेबल.




अनाथाश्रमातील मुलांची प्रवेशासाठी संस्थेस भेट.

कुशल औद्योगिक मनुष्यबळ विकसित करण्याबरोबरच शेकडो सूक्ष्म आणि लघु उद्योजक घडविण्याच्या प्रक्रियेत जिल्ह्यात सर्वाधिक कार्यक्षम औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणून नावलौकिक असणारी शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन्स (स्मॅक) संचलित श्रीमती सोनाबाई शं. जाधव मूलभूत प्रशिक्षण संस्था व स्वर्गीय जवानमलजी गांधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, म्हणजेच 'स्मॅक आयटीआय' होय.

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत मूलभूत प्रशिक्षण संस्थेची सुरुवात १९८० मध्ये झाली, जी उद्योजकांद्वारे चालविली जाते. या प्रशिक्षण योजनेचे राज्य आणि केंद्र संचालनालय परिषदांनी कौतुक केले आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची स्थापना १९९४ मध्ये झाली असून, ती कोल्हापूर परिसरातील सर्वांत मोठ्या खासगी आयटीआयपैकी एक आहे. संस्था अभियांत्रिकी शिक्षणक्षेत्रात प्रशिक्षण, अध्यापन आणि कौशल्य विकासाचा समावेश असलेला शैक्षणिक



**श्रीमती सोनाबाई शं. जाधव**
**मूलभूत प्रशिक्षण केंद्र (बी.टी.सी.)**



**स्वर्गीय जवानमलजी गांधी**
**औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय)**

उपक्रम राबविते.

आयटीआयच्या यशस्वी कारकिर्दीमध्ये असंख्य नामवंत उद्योजकांचे लाभलेले योगदान अविस्मरणीय आहे. त्याचप्रमाणे 'स्मॅक आयटीआय'च्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळणाऱ्या अनेक उद्योजकांनी 'आयटीआय'च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत कमिन्स इंडिया लिमिटेड, मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडिया, फेडरल बँक व जर्मन टूल्स या कंपन्यांशी असणारे सामंजस्य करार, वेल्डिंग सिम्युलेटर मशीन, हायड्रोलिक आणि न्यूमॅटिक ट्रेनर, डिजिटल क्लासरूम, कॅम्पस प्लेसमेंट आणि औद्योगिक प्रशिक्षणामध्ये मुलींचा सहभाग वाढविण्यासाठी राबविल्या



**संस्थेच्या स्वनिधीतून दहा हजार स्क्वेअर फुटाची ही नवीन इमारत उभी केली**



**पालक व विद्यार्थी मेळाव्यात प्रमुख अतिथी पौर्णिमा पाटील यांचे स्वागत.**

जाणाऱ्या विविध उपक्रमांमुळे 'स्मॅक आयटीआय'ला पश्चिम महाराष्ट्रामध्ये वेगळे स्थान निर्माण करून देते. राज्यातील औद्योगिक क्षेत्रात विविध कामांसाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे आणि त्यासाठी युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन सक्षम बनविणे या हेतूने कार्य करणाऱ्या उत्कृष्ट संस्थांमध्ये 'स्मॅक'चे योगदान आहे.

प्रशिक्षणार्थी केंद्रबिंदू मानून मागील तीन वर्षांत संस्थेतील प्रवेश १०० टक्के करणे, गळती शून्य करणे, निकाल १०० टक्के करणे आणि त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाते. शिरोली, गोकुळ शिरगाव व कागल पंचतारांकित या तीन औद्योगिक वसाहतींमधील पंचाहत्तरपेक्षा अधिक कंपन्यांसोबत संस्थेचा सामंजस्य करार आहे.

अद्ययावत प्रशिक्षण मिळण्याच्या दृष्टीने वेल्डिंग सिम्युलेटर, सीएनसी-व्हीएमसी मशीन, हायड्रोलिक व न्यूमॅटिक ट्रेनर, पीएलसी ट्रेनिंग किट, सॉलिड वर्क्स सॉफ्टवेअर, पीएलसी सॉर्टिंग मशीन यांसारख्या आधुनिक मशिनरींची सोय उपलब्ध केलेली आहे. याशिवाय डिजिटल क्लासद्वारे नऊ स्मार्ट बोर्डच्या साह्याने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. संस्थेचा संपूर्ण परिसर सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्हीच्या कक्षेत आहे.

अल्पमुदतीच्या कोर्सेसच्या माध्यमातून प्राप्त झालेला महसूल, शिस्त व स्वच्छता, प्रशिक्षणार्थींसाठी आयोजित करण्यात आलेले सॉफ्ट स्किल ट्रेनिंग, इंडस्ट्री व्हिजिट, ऑन जॉब ट्रेनिंग या सर्व कामांसाठी केंद्र शासननियुक्त 'क्रिसिल'मार्फत ३.१३ गुणांक प्राप्त करून संस्थांमध्ये 'स्मॅक आयटीआय' महाराष्ट्रात अव्वल स्थानी आहे. येथील उद्योजक औद्योगिक संस्था व्यवस्थापन समितीमध्ये असतात म्हणून ते दर्जेदार शिक्षण आणि रोजगारक्षमता कौशल्ये प्रदान करण्यासाठी नावीन्यपूर्ण व सर्जनशील आयाम स्वीकारून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करतात...

## अहवाल काळात संस्थेस कमिन्स इंडिया फाउंडेशनकडून प्राप्त झालेल्या आधुनिक मशीन

**१) हायड्रोलिक ट्रेनर २) सॉलिड वर्क्स सॉफ्टवेअर असलेले आधुनिक २१ संगणक संच ३) फिटर, इलेक्ट्रिशियन ट्रेडसाठीचे संपूर्ण ट्रेनिंग टूलकिट ४) 'अमेट्रॉल' या अमेरिकेतील कंपनीकडून कमिन्समार्फत इलेक्ट्रिकल ट्रेनिंग किट प्राप्त होणार असून (जून २०२३ पर्यंत) भारतात अमेट्रॉल प्रथमच सदर ट्रेनिंग किट देणार आहे. ५) सामंजस्य करारापासून आजपर्यंत 'कमिन्स'कडून जवळपास ३० पेक्षा जास्त आधुनिक यंत्रसामग्री 'सीएसआर'तून दिली आहे.**

**सरोज (माई) एन. पाटील**
ए-१, रुईकर कॉलनी, कोल्हापूर - ४१६००५
दिनांक ०९/०६/२०२२

मा. प्राचार्य,
स्मॅक आयटीआय, एमआयडीसी शिरोली.

स. न. वि. वि.

काल एका विद्यार्थ्यास घेऊन आपल्या केंद्रास भेट दिली व खूप समाधान, आनंद घेऊन घरी परतले. एका गरीब शेतकऱ्याचा मुलगा पायावर उभा राहून कौशल्याचे काम करीत राहील तर जीवनात दुसरा आनंद नाही.

आपण सर्वांनी माझे अत्यंत प्रेमाने, आपुलकीने स्वागत केले, शिक्षकांनी प्रत्येक ट्रेडची उत्तम माहिती सांगितली.

आज रोजंदारीचा प्रश्न मोठा आहे अशा स्थितीत आपल्या संस्थेचे काम फार मोठे व समाजास दिलासा देणारे आहे. आपण दोघे व आपला स्टाफ विद्यार्थ्यांशी प्रेमाने शिकवत होता हे सर्व पाहून मी खूप आनंदीत झाले. कारण आज शिक्षक मुलांचे नाते (प्रेमाचे) हे थोडे दुरावल्यासारखे वाटते, पण आपली संस्था पाहिली व जीवनात थोडीफार हिरवळ उगवत आहे याचे समाधान वाटते.

मी आजच चि. सुप्रियालाही आपल्या संस्थेबद्दल खूप काही लिहून पाठवले अशा संस्थांना इन्सेंटिव्ह दिला गेला पाहिजे अशाही सूचना केल्या आहेत.

Best Wishes....!

आ. नम्र.
**सरोज (माई) एन. पाटील**

## 'स्मॅक आयटीआय'ला शासनाकडून उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार

'स्मॅक आयटीआय'ला २०२०-२१ मध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्य शासनामार्फत 'उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार व नावीन्यता विभागाकडून पुणे विभागात (पाच जिल्ह्यांत) नोंद असणाऱ्या जवळपास ३७५ संस्थांमधून 'स्मॅक'ची 'बेस्ट आयटीआय' म्हणून निवड करण्यात आली आहे.

## श्री. राजू पाटील यांना 'आयडॉल्स महाराष्ट्र' पुरस्कार

'स्मॅक आयटीआय'चे चेअरमन श्री. राजू पाटील यांना दैनिक 'सकाळ'च्या वतीने कार्यरत व्यावसायिक अध्यक्ष गटातून 'आयडॉल्स महाराष्ट्र' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## नवीन प्राचार्यांचे स्वागत

'स्मॅक आयटीआय'च्या प्राचार्यपदी संस्थेने श्री. दत्तात्रय भास्कर पाठक यांची ०४ ऑक्टोबर २०२१ रोजी नियुक्ती केली. शासकीय आयटीआय व खासगी औद्योगिक क्षेत्रामध्ये मिळून त्यांचा ३७ वर्षांचा अनुभव आहे.

Emerging Engineering Export Hub

# 'स्मॅक'चा महत्त्वाकांक्षी पथदर्शी प्रकल्प 'एसईपी'




'सबकॉन - २०२२' प्रदर्शनामध्ये 'स्मॅक - इंडिया पॅव्हेलियन'चे उद्‌घाटन करताना भारताचे यूकेमधील महावाणिज्यदूत डॉ. शशांक विक्रम.




'इंडी - २०२२' प्रदर्शनामध्ये भेटीप्रसंगी तांझानियामधील भारताचे उच्चायुक्त बिनया श्रीकांत प्रधान.




डॉ. सुयश चव्हाण राजदूत भारतीय दूतावास म्युनिक (जर्मनी) यांची स्टॉलला भेट.




'इंडी-२०२२' प्रदर्शनामध्ये 'स्मॅक-इंडिया पॅव्हेलियन'



डीआयसी महाव्यवस्थापक सतीश शेळके यांना एसईपी चे निवेदन



ईईपीसी मुंबई कार्यालयामध्ये वरिष्ठ कार्यकारी अधिकारी वरूण चुलेट यांची भेट.




ईईपीसी चे चेअरमन महेश देसाई यांची भेट




एसईपी टीम इन लंडन




प्रदर्शनामधील उत्पादनाचे निरीक्षण करताना विदेशी ग्राहक.

# इंग्लंड, तांझानिया व जर्मनीतील प्रदर्शनात 'स्मॅक'चा सहभाग

## एमएसएमई उद्योजकांनी एकत्रित येऊन आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होण्याची पहिलीच घटना!

कोल्हापूरच्या औद्योगिक उत्पादनाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन 'स्मॅक'ने शिरोली औद्योगिक क्षेत्रामधील उद्योजकांचा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभाग वाढविण्यासाठी आणि त्यांना निर्यातविषयक अद्ययावत माहिती देऊन प्रोत्साहित करण्यासाठी 'स्मॅक'च्या संचालकांच्या पुढाकाराने 'स्मॅक एक्स्पोर्ट प्रमोशन' (एसईपी) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

या प्रकल्पासाठी निवडक निर्यातक्षम अनुभवी १९ एमएसएमई आधारित कंपन्यांचे क्लस्टर तयार केले आहे.

युनायटेड किंगडम (यूके)च्या प्रीमिअर सबकॉन्ट्रॅक्ट मॅन्युफॅक्चरिंग सप्लाय चेन शोअंतर्गत इंग्लंड येथील बर्मिंगहॅम येथे ७ ते ९ जूनदरम्यान पार पडलेल्या **'सबकॉन २०२२'** या आंतरराष्ट्रीय इंजिनिअरिंग प्रदर्शनात तसेच पूर्वआफ्रिकेतील तांझानियामध्ये २२ ते २४ सप्टेंबरदरम्यान पार पडलेल्या औद्योगिक उत्पादने, उपकरणे आणि यंत्रसामग्रीवरील **'इंडी २०२२'** या सर्वांत मोठ्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात व जर्मनीतील म्युनिक येथे २४ ते ३० ऑक्टोबर या कालावधीमध्ये आयोजित केलेल्या **'बाउमा – २०२२'** या जगातील आघाडीच्या व्यापार मेळाव्यामध्ये 'एसईपी'चे प्रतिनिधित्व करण्यासाठी स्मॅक स्किल ट्रेड प्रमोशन कमिटीचे चेअरमन 'एसईपी'चे मुख्य संयोजक अमर जाधव, अविनाश चिकनीस, विशाल मंडलिक, शैलेश शिंदे, रोहित मेनन, सचिन वाघरे व आदित्य हराळे उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात जगभरातील शेकडो उद्योजकांनी आपली उत्पादने मांडली. या प्रदर्शनात 'एसईपी' सदस्यांनी उपस्थित राहून ग्राहकांशी संवाद साधला. विविध उत्पादनांची, त्यांच्या गुणवत्तेची आणि वेळेत पुरवठा देण्याची हमी या सदस्यांनी यावेळी दिली. येथे भेट देणाऱ्या आंतरराष्ट्रीय ग्राहक कंपन्यांसाठी या प्रदर्शनाने एक संधी उपलब्ध करून दिली. कोल्हापूर येथे निर्माण होणाऱ्या अभियांत्रिकी उत्पादनाची माहिती या प्रदर्शनात देण्यात आली.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांनी एकत्रित येऊन आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ होती. शासनाच्या इंजिनिअरिंग एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल (ईईपीसी)अंतर्गत या प्रदर्शनातील स्टॉलमध्ये ४० टक्के सवलत मिळाली. फेरस कास्टिंग, नॉनफेरस कास्टिंग, स्टील अँड अलाय कास्टिंग, मशिनिंग प्रॉडक्ट अँड फॅब्रिकेशन या उद्योगांतील १९ कंपन्यांची उत्पादने या प्रदर्शनात ठेवली होती. 'स्मॅक अभियांत्रिकी निर्यात केंद्र–इंडिया' या नावाने प्रदर्शनात प्रशस्त स्टॉल घेण्यात आले होते.

इंग्लंड येथील स्टॉलचे उद्घाटन भारताचे यूकेमधील महावाणिज्यदूत डॉ. शशांक विक्रम यांच्या हस्ते झाले. तांझानियामधील स्टॉलला तेथील भारताचे उच्चायुक्त विनया श्रीकांत प्रधान यांनी व जर्मनीमधील स्टॉलला तेथील भारताचे राजदूत डॉ. सुयश चव्हाण यांनी भेट दिली. या भेटीमध्ये सर्व राजदूत यांना 'एसईपी क्लस्टर'बद्दल माहिती देण्यात आली. त्यांनी 'एसईपी' सदस्यांच्या कंपन्यांना व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी सर्वतोपरी मदत व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

जिल्हा उद्योग केंद्राच्या पुढाकाराने स्मॅक एक्स्पोर्ट प्रमोशन (एसईपी) चे मुख्य समन्वयक अमर जाधव यांच्या प्रयत्नातून कोल्हापूरच्या औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान देण्याचा हा प्रयत्न आहे.



महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रशांतकुमार मासाळ, अधिकाऱ्यांसमवेत बैठक.



ग्रामपंचायत शिये मालमत्ता कराबाबत सरपंच रेखा जाधव व सदस्यांबरोबर बैठक.



उद्योग संचालनालयचे सदाशिव सुरवसे, एमएसएमईचे अभय दप्तरदार यांना निवेदन.



एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राहुल भिंगारे यांना निवेदन.

# 'स्मॅक'ने राबविलेले उपक्रम...

**'स्मॅक' सदस्यांच्या अडचणी सोडविण्याकरिता स्मॅक भवनमध्ये विविध बैठकींचे आयोजन**

- टोप ग्रामपंचायत हद्दीतील उद्योजकांच्या मालमत्ता कराबाबत आलेल्या तक्रारींबाबत 'स्मॅक'च्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करून मार्ग काढण्यात आला. (२२ व २४/११ व २/१२)
- महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत सद्यःस्थितीमध्ये उद्योजकांची जादा मागणी लक्षात घेता एक नवीन सॅण्ड रिक्लमेशन प्लांटसंदर्भात जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूरचे महाव्यवस्थापक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक आयोजित करण्यात आली. (०५/०१/२१)
- ग्रामपंचायत शिये यांच्याकडून शिये कार्यक्षेत्रातील उद्योजकांना लाखो रुपयांची थकबाकी व चालू करामध्ये भरघोस वाढ अशा पद्धतीने करांची मागणी पावती पाठविण्यात आल्या होत्या, त्यासंदर्भात बैठका आयोजित करून मार्ग काढण्यात आला. (२५/०४/२२, १८/०५/२२ व १९/०६/२२)
- 'महावितरण'कडून केल्या जाणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत भेडसावणाऱ्या विविध अडचणी / समस्यांवर चर्चा करण्यासाठी 'स्मॅक'च्या पुढाकाराने बैठक आयोजित करण्यात आली. (२९/०६/२०२२)
- देशाच्या अस्मितेचा गौरव करण्यासाठी 'हर घर तिरंगा' मोहिमेबाबत व शिरोली औद्योगिक क्षेत्र वनराईने आकर्षक व सुंदर बनविण्यासाठी, पर्यावरण रक्षणासाठी वृक्षलागवड मोहिमेबाबत उद्योजकांसमवेत बैठकीचे आयोजन केले गेले. (२९/०७/२०२२)

**अडचणींसंदर्भात पाठपुरावा**

- शिरोली औद्योगिक क्षेत्रात अपुऱ्या दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबत एमआयडीसी अधिकाऱ्यांची भेट घेण्यात आली. (२३/११/२१)
- १८ जानेवारी रोजी शिरोली ग्रामपंचायत कचरा डेपोमुळे स्मॅक भवन परिसरातील लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर 'स्मॅक'द्वारा तत्काळ केलेल्या पाठपुराव्यामुळे एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी स्मॅक भवनला भेट देऊन याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन दिले. (२०/०१/२२)
- एमआयडीसीकडून 'स्मॅक'ला वृक्षारोपणाकरिता (वनीकरण) वाटप केलेल्या भूखंडास मुदतवाढ मिळावी व कचरा डेपोसंदर्भात एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांची भेट घेऊन मागणी पत्र दिले. त्यांनी दोन्ही कामांबाबत महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कोल्हापूर दौऱ्यावेळी त्यांना स्मॅक भवन येथे प्रत्यक्ष भेट घडवून हे दोन्ही विषय मार्गस्थ करण्याचे आश्वासन दिले. (१५/०२/२२)
- राज्याचे माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांना एमआयडीसीच्या भूखंडाची प्रस्ताविक दरवाढ पुढे ढकलण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला. (२२/०३/२२)




कौशल्य विकास व रोजगार विभाग सेमिनार मध्ये उपस्थित सहा. आयुक्त एस. के. माळी.




ईएसआयसी सेमिनार मध्ये मार्गदर्शन करताना उप प्रादेशिक अधिकारी सी. आर. पाटील.




ईईपीसी सेमिनारमध्ये मार्गदर्शन करताना प्रादेशिक संचालक डॉ. रजत श्रीवास्तव.



जीएसटी - अभय योजना बैठकीमध्ये उपस्थित राज्यकर उपायुक्त शर्मिला मिस्कीन.

### सभासदांबरोबर समन्वय

- 'स्मॅक'च्या सभासद उद्योजकांना उद्योगविषयक माहिती तत्काळ मिळण्याकरिता विविध शासकीय कार्यालयांकडून येणारी माहिती, शासनाचे जीआर, आदेश, अधिसूचना व निर्णय, सर्क्युलर, जीएसटीमध्ये होणारे बदल, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र, एम.आय.डी.सी., लेबर ऑफिस, महावितरण, फॅक्टरी ऑफिस, ईएसआयसी, प्रॉव्हिडंट फंड तसेच विविध कार्यक्रम, सभा, सेमिनार, वेबिनार, सामाजिक उपक्रम यांची माहिती 'स्मॅक'च्या सभासदांना व्हॉटस्ॲप व ईमेलद्वारे पाठविण्यात येतात. यामध्ये दैनंदिन कामकाजामधील एमआयडीसीकडून तांत्रिक बिघाडामुळे देण्यात येणाऱ्या पाणी बंद सूचना व 'महावितरण'कडून वीज बंदच्या सूचना सभासदांना पूर्व नियोजनासाठी वेळोवेळी पाठविल्या जातात.
- सभासद उद्योगांचे प्रश्न, सूचना, तक्रार एमआयडीसी, महावितरण, डीआयसी, ग्रामपंचायत, कौशल्य रोजगार व उद्योजकता विभागापर्यंत तत्काळ पोहोचण्याकरिता व्हॉटस्ॲप ग्रुप्स तयार करण्यात आले असून, त्यावर तक्रारी पाठवून त्यांचे निरसन करण्यात येते.
- शिरोली औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची (स्ट्रीट लाईट) पाहणी, आठवड्यातून एकदा दर शुक्रवारी 'स्मॅक', एमआयडीसीचे प्रतिनिधी, महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार, ठेकेदारांच्या प्रतिनिधींसह पथदिव्यांची पाहणी केली जाते व त्याच्या अहवालाच्या आधारे बंद असलेल्या पथदिव्यांची दुरुस्ती केली जाते.
- 'स्मॅक'च्या पुढाकाराने उद्योजकांच्या वीजविषयक तक्रारी 'महावितरण'कडे तात्काळ पोहोचण्याकरिता तसेच 'महावितरण'कडून दिल्या जाणाऱ्या पूर्वसूचना, महत्त्वाचे संदेश आपल्यापर्यंत तत्काळ मिळण्याकरिता फिडर वाईज २२ व्हॉटस्ॲप ग्रुप्स तयार करण्यात आले. (१२/०७/२०२२)
- स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत शिरोली ग्रामपंचायतीला राष्ट्रध्वज देण्यात आले, तसेच उद्योजकांनी त्यांच्या उद्योगांच्या इमारतीवर व कर्मचारी, कामगारांना त्यांच्या घरावर राष्ट्रध्वज लावण्यासाठी देण्याकरिता समन्वय साधला. या अभियानामध्ये सहभागी होण्यासाठी स्वतंत्र व्हिडिओ करून सभासदांना पाठविण्यात आला. राष्ट्रध्वज लावण्याचे, त्याची घ्यावयाची काळजी व उतरण्याचे नियम उद्योजकांना कळविण्यात आले. (१३ ते १५ /०८/२२)

### शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी सेमिनार्स

- 'स्मॅक' व बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने एमएसएमई आऊटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बँकेकडून एमएसएमई ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विनाप्रक्रिया शुल्क पतपुरवठ्याच्या वैविध्यपूर्ण कर्ज योजनांची माहिती शिरोली औद्योगिक क्षेत्रांमधील एमएसएमईंना देण्यात आली. (२३/११/२१)
- मा. जिल्हाधिकारीसो राहुल रेखावर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योगमित्र व जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती सभा बैठकीचे स्मॅक भवनमध्ये आयोजन करण्यात आले. यावेळी 'स्मॅक'कडून 'एसईपी'चे पीपीटी प्रेझेंटेशन सादरीकरण करण्यात आले. शिरोली औद्योगिक



उद्योजक, कर्मचाऱ्यांसाठीच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना एमपीएम पुणे चे मनीष पत्रीकर.



इनोवेशन फेस्टिवल – मान्यवर व पुरस्कार विजेते इनोव्हेटर्स.




महावितरण मोर्चा – अधिक्षक अभियंता अंकुर कावळे यांना निवेदन.



छ. शाहू महाराज छायाचित्र वितरण.

क्षेत्रातील कचरा डेपो, मेनन पिस्टन्स समोरील गतिरोधक यासंदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आले. (२१/१२/२१)

- 'स्मॅक'च्या वतीने कौशल्य विकास, रोजगार व उद्योजगता विभाग यांच्याकडून मनुष्यबळाची आणि त्यान्वये कौशल्यांची, रोजगार आणि कौशल्य विकाससंबंधी येत असलेल्या समस्यांची, तंत्रज्ञानात होत असलेले बदल आणि भविष्यात तयार होणाऱ्या नवीन जॉब रोल्सबाबत व 'ईएसआयसी'कडून दिल्या जाणाऱ्या आस्थापनांसाठी पूरक अशा विविध शासकीय योजनांची माहिती मिळण्याकरिता स्मॅक भवनमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आली. (३०/१२/२१)
- कर्मचारी भविष्य निधी संघटन (ईपीएफओ)च्या नवीन उपक्रमांतर्गत कर्मचाऱ्यांना ईपीएफओ सेवा मिळण्याचे स्वातंत्र्य देण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांचे ई–नॉमिनेशन पूर्ण करण्याकरिता प्रोत्साहन देण्यासाठी तसेच मदत करण्यासाठी कर्मचारी भविष्य निधी संघटन क्षेत्रीय कार्यालय कोल्हापूर व 'स्मॅक' यांच्या संयुक्त विद्यमाने ई–नामांकन प्रक्रियेचे प्रात्यक्षिक आयोजित केले होते. (२५/०२/२२)
- 'स्मॅक', इंजिनिअरिंग एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल (ईईपीसी) व विविध औद्योगिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने निर्यात प्रोत्साहनासाठी क्षमता निर्माण कार्यक्रमांतर्गत 'एक्स्पोर्ट प्रमोशन–इंजिनिअरिंग प्रॉडक्ट्स' विषयावर स्मॅक भवनमध्ये कार्यशाळा आयोजित केली होती. 'ईईपीसी'चे प्रादेशिक संचालक डॉ. रजत श्रीवास्तव, एक्स्पोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (ईसीजीसी) चे शाखा व्यवस्थापक सिरसेंदू मुखर्जी, बँक ऑफ महाराष्ट्रचे फॉरेन एक्स्चेंजचे प्रभारी ऋषिकेश घोरपडे, जिल्हा उद्योग केंद्राचे सतीश शेळके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी 'एसईपी'चे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण करण्यात आले. (०८/०३/२२)
- जीएसटीपूर्व व्हॅट आणि बीएसटी थकबाकीदारांसाठी महाराष्ट्र शासनाची अभय योजना २०२२ तसेच अपीलमध्ये प्रलंबित विषयांबाबत माहिती व मार्गदर्शनासाठी अधिकाऱ्यांसमवेत उद्योजक, अकाउंटंट, त्यांचे करसल्लागार यांची स्मॅक भवनमध्ये बैठक आयोजित केली होती. (०४/०५/२२)

### स्मॅक भवनमध्ये कार्यशाळांचे आयोजन

'स्मॅक' व आयआयएफ कोल्हापूर चॅप्टर व पश्चिम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नामांकित व्याख्यात्यांद्वारे उद्योग क्षेत्राशी निगडित विविध विषयांवर फाउंड्री उद्योजक, फाउंड्री मॅनेजर्स, सीईओ, व्यवस्थापक, इंजिनिअर्स, विभागप्रमुख, एच. आर., सुपरवायझर्स व कामगार, कर्मचारी यांच्याकरिता चार निःशुल्क यशस्वी कार्यशाळांचे स्मॅक भवन येथे आयोजन केले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. सरासरी या कार्यशाळेसाठी ८५ ते ११० इतकी उपस्थिती होती. कार्यशाळेमध्ये ज्ञान अर्जित केलेल्या माहितीचा प्रत्यक्ष वापर करून कित्येक उद्योजकांना याचा लाभ झाल्याची प्रतिक्रिया नोंदविण्यात आली.

- 'प्रभावी सुपरव्हीजन यशाचा मार्ग' या विषयावर श्री. संतोष रंगरेज, सहाय्यक महाव्यवस्थापक, मे. मेनन अँड मेनन लि. यांची कार्यशाळा आयोजित केली गेली. सुपरवायझरची कार्यालयातील विविध कार्ये, भूमिका कशी असावी, यावर श्री. रंगरेज यांनी मार्गदर्शन केले. (२५/०१/२२)



स्वच्छता अभियानामध्ये सहभागी एमआयडीसी आणि प्रदुषण मंडळाचे अधिकारी.



राष्ट्रीय मतदार दिन - प्रतिज्ञा वाचन.



महिला दिनानिमित्त प्रभाताई कुलकर्णी यांचा सन्मान.



शिरोली ग्रामस्थांसाठी राष्ट्रीय ध्वज वितरण.

- 'अॅडव्हान्स इनोक्युलेंट्सह बेसिक्स फॉर रिजेक्शन अँड मशिनिबिलिटी' या विषयावर संवादात्मक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे व्याख्याते श्री. मनीष पत्रीकर यांनी कास्टिंग बनविण्याचे तत्त्वज्ञान तसेच रिजेक्शन आणि मशीनिबिलिटी इत्यादींसाठी केस स्टडीसह मूलभूत प्रभाव यांचे स्लाईडस्च्या माध्यमातून मार्गदर्शन केले. (१३/०२/२२)
- 'खर्च नियंत्रण आणि गुणवत्तावाढीद्वारे उत्पादकता सुधारणा' या विषयावर श्री. मिलिंद भावे यांच्या अनोख्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. संसाधनांचा कार्यक्षम वापर करून उत्पादकता वाढविण्याचे महत्त्व यावर त्यांनी मार्गदर्शन केले. (१५/०४/२२)
- 'बीपी ऑप्टिमायझेशन बीपी वे' या विषयावर अनोख्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेमध्ये बीईपीचे मॉडेल उदाहरणासह व्याख्याते श्री. निलेश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. (२०/०५/२२)

### शासकीय / संघटना बैठकांमध्ये सहभाग

- जिल्हाधिकारीसाो यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समिती सभेमध्ये सहभाग नोंदविला. (०१/०९/२०२१)
- जिल्हाधिकारीसाो यांच्या अध्यक्षतेखालील निर्यातदारांच्या परिषदेमध्ये सहभाग नोंदविला. (२४/०९/२०२१)
- जिल्हा परिषद, कोल्हापूरद्वारा आयोजित 'दिव्यांग रोजगार मेळावा २०२१'मध्ये 'स्मॅक'चा स्टॉल उभारून सहभाग नोंदविला. (३१/१०/२१)
- वीज, जीएसटी, डीआयसी, एमआयडीसी, लेबर कोड, विमान सेवा, ईएसआयसी, फॅक्टरी ऑफिस, एमपीसीबी. इ. कार्यालयांच्या धोरणात्मक विषयांबाबत चर्चा करण्यासाठी विविध औद्योगिक संघटनांच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या आयोजित बैठकीत सहभाग नोंदवून शिरोली औद्योगिक क्षेत्रातील प्रश्न आणि समस्या मांडण्यात आल्या. (०२/०३/२२)
- राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १००व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने कोल्हापूर जिल्हा प्रशासनाद्वारा आयोजित लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्वांतर्गत छत्रपती शाहू महाराजांचे छायाचित्र कारखान्यांमध्ये प्रदर्शित करण्याकरिता उद्योजकांना वितरित करण्यात आले. (२५/०४/२२)
- औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठातील सैफ सेंटर आणि उद्योग संवाद केंद्रातर्फे आयोजित कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला. (२८/०४/२०२२)
- 'स्टार्टअप आणि इनोव्हेशन फेस्टिव्हल २०२२'मध्ये उद्योगांच्या दीर्घकालीन शाश्वत वाढीसाठी 'स्मॅक' व मयुरा स्टील्सने प्रायोजकत्व स्वीकारले. (२, ३ व ४/०५/२२)
- 'स्टार्टअप आणि इनोव्हेशन फेस्टिव्हल २०२२' मध्ये रॅबिट टोरटाईस एंटरटेनमेंट प्रा.लि.ला पहिल्या क्रमांकासाठीच्या बक्षीस रकमेचा चेक 'स्मॅक'कडून देण्यात आला. (०४/०५/२०२२)
- शिरोली औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांनी कृतज्ञता पर्वांतर्गत १०० सेकंद स्तब्धता पाळून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना आदरांजली अर्पण करण्यात आली. (०६/०५/२२)




रक्तदान शिबिराचे आयोजन.



माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण भेट.




एमआयडीसी जॉईन्ट सीईओ ए. एस. रंगा नाईक यांची भेट.




सर्व औद्योगिक संघटना बैठक सहभाग.

- 'महावितरण'ने सर्व वीज ग्राहकांना नेहमीच्या वीज बिलाव्यतिरिक्त दोन महिन्यांच्या सरासरी वीज बिलाइतकी अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम भरावी म्हणून बिले वीज ग्राहकांना पाठविण्यात आली होती. याबाबत आयोजित बैठकीमध्ये भाग घेतला. (१७/०५/२२)
- जागतिक पर्यावरणदिनाचे औचित्य साधून एमआयडीसीच्या संयुक्त विद्यमाने शिरोली औद्योगिक क्षेत्रात स्वच्छता अभियान मोहिमेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. (०५/०६/२२)
- सर्व औद्योगिक संघटनांच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची २ मार्च २०२२ रोजी संयुक्त सभा संपन्न झाली. या सभेमध्ये चर्चिलेल्या विविध प्रश्न आणि समस्यांबाबत आयोजित आढावा बैठकीमध्ये सहभाग नोंदविला गेला. (१७/०६/२२)
- मा. जिल्हाधिकारीसाो यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या जिल्हा उद्योगमित्र समितीच्या बैठकीत स्मॅक भवनशेजारील एमआयडीसीच्या जागेत शिरोली पुलाची ग्रामपंचायतीला कचरा टाकण्यास मनाई करणे, शिरोली औद्योगिक क्षेत्रामध्ये 'महावितरण'कडून तासन्‌तास वीज खंडित होत असल्याबाबत, शिरोली महावितरणच्या कार्यालयामध्ये सहाय्यक अभियंत्याची नियुक्ती होण्याबाबतचे विषय मांडण्यात आले. त्यास अनुसरून मा. जिल्हाधिकारी यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. याची दखल घेत 'महावितरण'कडून फिडरवाईज २२ व्हॉट्स्‌ॲप ग्रुप तयार करण्यात आले आणि कायमस्वरूपी सहाय्यक अभियंत्याची नियुक्ती करण्यात आली. 'महावितरण'ने नवीन वीजवाहिनी टाकण्याचे काम सुरू केले, ज्यामुळे शिरोली एमआयडीसीत आता अखंडित वीजपुरवठा होईल. (२०/०७/२२)
- 'आजादी का अमृतमहोत्सव'अंतर्गत शिरोली औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांमार्फत मा. जिल्हाधिकारीसाो यांनी उद्योगांनी वृक्षारोपण करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार समन्वय साधला. (२९/०७/२०२२ व १५/०८/२०२२)
- उद्योग केंद्र कोल्हापूरच्या वतीने 'डीजीएफटी'च्या एक्स्पोर्ट विभागाच्या पुढाकाराने मा. जिल्हाधिकारीसाो यांच्या उपस्थितीत निर्यातविषयक कार्यशाळेमध्ये 'एसईपी'द्वारा सहभाग घेऊन निर्यातविषयक प्रेझेंटेशन करण्यात आले. (१०/०८/२०२२)
- सर्व औद्योगिक संघटनांच्या वतीने वीज दरवाढीबाबत महावितरण कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चामध्ये सहभाग नोंदविला. (१२/०८/२२)
- औद्योगिक समस्या सोडविण्याबाबत मा. आमदार, संबंधित विभागाचे सरकारी अधिकारी व सर्व औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त बैठकीमध्ये कचरा डेपो, ईएसआयसी सेवा दवाखाना, गटर्स आणि ड्रेनेज सिस्टीमची दुरुस्ती करणे, नालासफाईबाबत तक्रारी मांडल्या. (१४/०९/२०२२).
- आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग वाढविण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राद्वारे निर्यातदारांची कार्यशाळा व निर्यात उत्पादनांचे प्रदर्शन आयोजित करण्यामध्ये सहभाग नोंदवून 'एसईपी' प्रकल्पाची माहिती सादर केली. (३०/०९/२२)

### शासन उपक्रमांची अंमलबजावणी

- राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीदिनी एमआयडीसी व 'स्मॅक'द्वारा शिरोली



जिल्हाधिकारी राहुल रेखावार, डीआयसी, डीजीएफटी अधिकाऱ्यांसमवेत बैठक.



सरोज (माई) एन. पाटील आयटीआय भेट.



स्मॅक भवन रस्ता वृक्षारोपण.




स्मॅक भवन दिशादर्शक बोर्ड अनावरण.

औद्योगिक क्षेत्र सुंदर, हरित व पर्यावरणपूरक करण्यासाठी आयोजित केलेल्या क्लीन एमआयडीसी अभियानामध्ये सभासदांसह सहभाग नोंदविला. (०२/१०/२१ व ०२/१०/२२)

- २५ जानेवारी या 'राष्ट्रीय मतदार दिना'निमित्त स्मॅक भवनमध्ये उद्योजक व कामगार यांच्या उपस्थितीत प्रतिज्ञा देण्यात आली. (२५/०१/२२)
- महिलादिनाचे औचित्य साधून उद्योजिका कणेरी एंटरप्राईजेसच्या प्रोप्रायटर संयोगिता पाटील व त्रिमूर्ती इंजिनिअरिंग टूल्स प्रायव्हेट लिमिटेड सांगलीच्या व्यवस्थापक संचालिका प्रभाताई कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. (०८/०३/२२)
- प्रशासनाकडून वृक्षारोपणासाठी केलेल्या आवाहनानुसार स्मॅक भवनमध्ये वनराई फाउंडेशन, शिरोली पुलाचीद्वारा 'स्मॅक'चे निमंत्रित सदस्य भरत सोमय्या यांच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले. 'स्मॅक'द्वारा वृक्षारोपण केलेल्या झाडांचे ठिबक सिंचनाच्या माध्यमातून संगोपन केले जाते. (०४/०७/२०२२)
- भारत सरकारच्या 'हर घर तिरंगा' उपक्रमास प्रतिसाद देत शिरोली पुलाची ग्रामपंचायतीस 'स्मॅक'चे संचालक श्री. राजू पाटील व श्री. भरत व दीपक जाधव त्यांच्या योगदानातून १००० राष्ट्रीय ध्वज देण्यात आले. (१२/०८/२०२२)

### सेवा दवाखाना एमआयडीसी शिरोली

- शिरोली मॅन्यफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूरच्या पुढाकाराने स्मॅक भवनमध्ये महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीद्वारा शिरोली औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसाठी सेवा दवाखाना कार्यरत आहे. सप्टेंबर २०२१ ते नोव्हेंबर २०२२ अखेर ३,७६२ विमाधारकांनी नोंदणी केली आहे. त्यांच्या कुटुंबीयांची संख्या ४,८०३ इतकी आहे. अशी एकूण संख्या ८,०८६ इतकी आहे. या दवाखान्यात अपघाताचे जास्त रुग्ण येतात. (उदा. कापणे, भाजणे, बीपी, शुगर, इ.) येथे पुरुष व महिला डॉक्टर, २ फार्मासिस्ट, क्लार्क, नर्स, २ एमटीएस, स्वीपर असा स्टाफ आहे.

**(सेवा दवाखान्याची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते ५.३० असून, शनिवारी १० ते १. रविवारी साप्ताहिक सुट्टी व शासकीय सुट्ट्यांदिवशी दवाखाना बंद असतो.)**

### आरोग्यविषयक कार्य

- 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष' राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त व समाजोपयोगी उपक्रम म्हणून 'स्मॅक', रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मेन व रोटरी क्लब होरायझन, टीएलसी यांच्या संयुक्त विद्यमाने दोन वेळा रक्तदान शिबिराचे स्मॅक भवन येथे आयोजन करण्यात आले आणि अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. (२६/०९/२१, २६/०६/२२)
- शिरोली औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यरत कामगार व कर्मचारीबांधवांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून 'स्मॅक'द्वारा ईएसआयसीमार्फत मोफत आरोग्य तपासणी व जागरूकता शिबिर आयोजित करण्यात आले. (३०/१२/२१)
- ग्रामपंचायत टोप यांच्याकडून आपल्या सभासदांना नेहमीच सहकार्य केले



शिवाजी विद्यापीठामध्ये आयोजित कार्यशाळेमध्ये उपस्थित कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के.




एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी राहुल भिंगारे यांचा सन्मान



कै. आम. चंद्रकांत जाधव शोकसभा आयोजन




उद्योगपती चंद्रशेखर डोली, पद्माकर सप्रे, प्रताप पुराणिक व एम. बी. शेख यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान.



उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत गोसावी यांची सदिच्छा भेट.



शिरोली पोलिस ठाणे सहा. पो. निरीक्षक सागर पाटील यांचा सन्मान.

जाते. त्यांच्याकडील क्लार्क श्री. बाबासो नामदेव पाटील यांच्यावरील कॅन्सर उपचारासाठी मदत केली. (०२/०९/२०२२)

### स्मॅक भावनास मान्यवरांची भेट

- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी स्मॅक भवन, आयटीआय व सॅण्ड रिक्लमेशन प्लांटला सदिच्छा भेट दिली. (२५/१०/२१)
- एक्स्पोर्ट इम्पोर्ट बँक ऑफ इंडिया (एक्झिम)च्या व्यवसाय विकास समूहाचे मुख्य प्रबंधक दिव्या हरिहरन यांनी कोल्हापुरातील निर्यातदार कंपनीच्या वित्तपुरवठा आवश्यकता समजून घेण्यासाठी व बँकेच्या विविध वित्तपुरवठा पर्यायांची माहिती देण्यासाठी स्मॅक भवनला भेट दिली, तसेच 'एमएसएमई'चे अधिकारी विकास वर्मा सहाय्यक संचालक व प्रतीक पराशर फिल्ड ऑफिसर, सेंटर हेड कोल्हापूर यांनी 'एमएसएमई'च्या निर्यातविषयक योजनांची माहिती देण्याकरिता स्मॅक भवनला भेट दिली. (१६/११/२१)
- कचरा डेपोसंदर्भात एमआयडीसीचे जॉईन्ट सीईओ ए. एस. रंगा नाईक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी फारुख मुकादम यांनी स्मॅक भवनास भेट दिली आणि कचरा डेपोची पाहणी केली. (२६/०५/२२)

### क्रीडा सहभाग

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या वतीने आयोजित चेंबर चषक क्रिकेट स्पर्धेत 'स्मॅक'च्या संघाने सहभाग नोंदविला... (१८,१९, २०/०२/२०२२)

# ४६व्या वार्षिक सभेत उद्योजकांचा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान




● श्री. पद्माकर विनायक सप्रे



● श्री. रघुनाथ बळवंत थोरात




● श्री. माधवन नानू पिल्लई



● श्री. बाळासाहेब शिवराम जाधव




● श्री. राजाराम बाळू वागरे



● श्री. राजुल अनिल लाईन्सवाला




● डॉ. जे. एफ. पाटील यांचा सर्व संघटनांच्या वतीने सत्कार



● प्रायोजक श्री. विश्वजित जोशीलकर यांचा सत्कार.




# 'स्मॅक' ४६वी वार्षिक सर्वसाधारण सभा, पुरस्कार वितरण व व्याख्यान सोहळा...!

सभेतील मनोगते...




(कै.) आमदार चंद्रकांत जाधव



श्री. दीपक पाटील



श्री. एम. वाय. पाटील




स्मॅकचे अध्यक्ष श्री. अतुल पाटील यांचे मनोगत.



श्री. राजू पाटील



श्री. नीरज झंवर



श्री. अमर जाधव



श्री. सचिन पाटील




**वार्षिक सभेमध्ये दीपप्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे डॉ. जे. एफ. पाटील. सोबत दिवंगत आमदार चंद्रकांत जाधव.**

# उद्योजकांनी अत्याधुनिक तंत्रज्ञान स्वीकारावे : डॉ. जे. एफ. पाटील

## शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर 'स्मॅक'च्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'देशाची औद्योगिक वाटचाल आणि पुढील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन

दिनांक १७ ऑक्टोबर २०२१ रोजी शिरोली मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, कोल्हापूर 'स्मॅक'ची ४६वी वार्षिक साधारण सभा, पुरस्कार वितरण व व्याख्यान सोहळा श्री रामप्रताप झंवर हॉल, स्मॅक भवनमध्ये मान्यवर सभासदांच्या उपस्थितीत अत्यंत चांगल्यारीतीने पार पडला.

**'स्मॅक'चे अध्यक्ष अतुल पाटील हे सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांची, तर तत्कालीन उद्योजक व दिवंगत आमदार चंद्रकांत जाधव यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली.**

प्रारंभी अध्यक्ष अतुल पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये वर्षभर केलेल्या कामांचा आढावा घेतला.

मान्यवर सदस्यांनी सभेमध्ये सर्व विषय सर्वानुमते मंजूर केले. संचालक मंडळाने महत्त्वाचे दोन विषय चांगल्या रीतीने हाताळल्याबद्दल ॲड. अशोक उपाध्ये तसेच शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लांटचे चेअरमन नीरज झंवर यांनी विशेष परिश्रम घेऊन गेल्या काही वर्षांत हा प्रकल्प प्रगतिपथावर आणल्याबद्दल उद्योजक रामराजे बदाले यांनी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. हा ठराव सर्वानुमते टाळ्यांच्या गजरात मंजूर करण्यात आला.

डॉ. जे. एफ. पाटील व दिवंगत आमदार चंद्रकांत जाधव यांचा अतुल पाटील व दीपक पाटील यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची मूर्ती आणि शाल देऊन सन्मान करण्यात आला.

वयाची पंच्याहत्तरी पार केल्यावरही जे उद्योगात कार्यमग्न असतात, जे आजही नियमित कारखान्यामध्ये येतात, निर्णय प्रक्रिया व कामकाजामध्ये भाग घेतात, असे ज्येष्ठ उद्योजक सर्वश्री ट्रीयो एंटरप्राईजेसचे पद्माकर विनायक सप्रे, महाराष्ट्र फोर्ज प्रायव्हेट लिमिटेडचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक रघुनाथ बळवंत थोरात, विश्वकर्मा फाउंडर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब शिवराम जाधव, गीता पंप्स प्रायव्हेट लिमिटेड, नीता इन्स्ट्रुमेंट्स, पाल अँड वॅट एंटरप्राईजेस, पिल्लई ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक माधवन नानू पिल्लई, सफल इंजिनिअर्स अँड फॅब्रिकेशनचे राजाराम बाळू वागरे, कोल्हापूरमध्ये उच्चांकी १५८ वेळा रक्तदान केल्याबद्दल तसेच एप्रिल २१ ते ऑगस्ट २१ दरम्यान कोरोना वॉरियर म्हणून योगदान दिल्याबद्दल राजुर्वी इंजिनिअर्सचे राजुल अनिल लाईन्सवाला यांचा डॉ. जे. एफ. पाटील व तत्कालीन आमदार चंद्रकांत जाधव यांच्या हस्ते रा. छ. शाहू महाराजांची मूर्ती, सन्मानपत्र व शाल देऊन सन्मान करण्यात आला.

उद्योग लहान किंवा मोठा असा फरक न करता अत्याधुनिक तंत्रज्ञान स्वीकारा, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी आपल्या व्याख्यानामध्ये केले. ते म्हणाले की, धडपडणारी माणसं आणि त्यांना पैसा पुरविणारी यंत्रणा एकत्रित कार्य करीत असतील, तरच विकास होतो. १९९१ हे वर्ष भारताच्या औद्योगिक धोरणात वॉटरमार्क ठरले. कारण येथूनच उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाची सुरुवात झाली. मार्केट व्यवस्था व्यवस्थित चालण्यासाठी सरकार काही गोष्टी कायद्याच्या चौकटीत आणते. सरकार कुणाचे आहे यापेक्षा



वार्षिक सभेमध्ये मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे डॉ. जे. एफ. पाटील.



वार्षिक सभेवेळी प्रायोजकांच्या स्टॉलला उद्योजकांनी भेट दिली.

धोरणे महत्त्वाची, असे त्यांनी नमूद केले. माणसाच्या कल्याणाचा विचार करणाऱ्या संशोधनाला यावर्षी सर्वप्रथम नोबेल प्राईज मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. उद्योग-व्यवसाय वाढत असताना लोकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून द्या, त्यामुळे बेरोजगारी वाढणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

कोरोना महामारीनंतर कच्च्या मालाची दरवाढ ही उद्योगावर आलेली त्सुनामी आहे. दिवाळीनंतर कास्टिंगसाठी दरवाढ मिळाली नाही, तर उद्योग टिकणार नाहीत. वीज बिलाबाबत राज्य सरकारने कोणतीही मदत केली नाही. सरकारने यावर पुन्हा एकदा विचार करावा, असे आवाहन दिवंगत आमदार चंद्रकांत जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनपर विचारामध्ये व्यक्त केले. 'स्मॅक'ने केलेले भरीव कार्य अविस्मरणीय असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

स्मॅक आयटीआय ट्रेनिंग कमिटीचे चेअरमन राजू पाटील, कोल्हापूर फाउंड्री अँड इंजिनिअरिंग क्लस्टरचे चेअरमन सचिन पाटील, शिरोली सॅण्ड रिक्लमेशन प्लांट कमिटीचे चेअरमन नीरज झंवर, सेमिनार कमिटीचे चेअरमन अमर जाधव यांनी अहवाल सालात केलेल्या कामांचा आढावा घेतला.

यावेळी वरूण चुलेट यांनी झूमच्या माध्यमातून ईईपीसीवरून निर्यात योजनांची माहिती सांगितली. ऑ. सेक्रेटरी जयदीप चौगले, ट्रेझरर एम. वाय. पाटील, संचालक सुरेंद्र जैन, श्यामसुंदर तोतला, प्रशांत शेळके, जयदत्त जोशीलकर, भरत जाधव, स्वीकृत संचालक सोहन शिरगावकर, रवी डोली, निमंत्रित सदस्य नामदेव पाटील, आय. ए. पाटील, अविनाश चिकनीस, प्रवीण पटेल, बदाम पाटील, भीमराव खाडे, आर. बी. वारनूळकर, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, मानद सचिव धनंजय दुग्गे, 'गोशिमा'चे अध्यक्ष मोहन पंडितराव, उपाध्यक्ष दीपक चोरगे, 'मॅक'चे अध्यक्ष संजय पेंडसे, श्रीकांत पोतनीस आदींसह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपाध्यक्ष दीपक पाटील यांनी आभार मानले. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले...

Shiroli Manufacturer's Association, Kolhapur

# INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR 2021-2022 (ENDED 31.3.2021)

| 2020-21 | EXPENDITURE | 2021-22 | | 2020-21 | INCOME | 2021-22 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Amount | | Amount | Amount | Amount | | Amount | Amount |
| | | | | | | | |
| **312,386** | **(A) TO EXPENDITURE IN RESPECT** | | | | **BY RENT** | | **861,525** |
| | **OF PROPERITIES** | | **363,620** | **591,682** | 1. Building /Shop/Hall Rent | 567,268 | |
| 146,380 | 1. Electricity Charges | 151,718 | | | 2. ESI Hospital Rent | 294,257 | |
| 14,564 | 2. Water Charges | 68,719 | | | | | |
| 151,442 | 3. Repairs & Maintenance | 143,183 | | | | | |
| | | | | **943,301** | **BY BANK INTEREST** | | **324,659** |
| | | | | | | | |
| | | | | 4,731 | Smak IDBI Bank 7308 | 4,808 | |
| **1,375,376** | **(B) TO ESTABLISHMENT EXPENSES** | | **1,082,615** | 9,531 | Smak ITI IDBI Bank 7313 | 3,530 | |
| 532,702 | 1. Salary | 516,608 | | 1,446 | Smak Trustee IDBI Bank 0657 | - | |
| 50,543 | 2. Provident Fund | 310,789 | | - | Smak SBI Bank 0707 | - | |
| 28,638 | 3. Bonus | 59,470 | | 724,137 | Group Gratuity (LIC) | - | |
| 724,137 | 4. Group Gratuity Paid | 100,000 | | - | Group Gratuity Interest | - | |
| 39,356 | 5. Legal Charges | 95,748 | | - | Smak BOB FD interest | 311,282 | |
| | | | | - | Smak ITI IDBI Bank 4248 | 5,039 | |
| **10,000** | **(C ) TO AUDIT FEES** | 10,000 | **10,000** | | | | |
| | | | | | | | |
| | | | | **1,125,000** | **By Donation** | | **1,273,001** |
| **1,508,763** | **(D) TO MISCELLANEOUS EXPENSES** | | **1,681,701** | 1,125,000 | Smak Bhavan Donation | 1,273,001 | |
| 8,530 | 1. Newspers & Periodicals Expenses | 8,670 | | | | | |
| 50,017 | 2. Printing & Stationery | 68,968 | | **1,911,610** | **BY INCOME FROM OTHER SOURCES** | | **2,508,306** |
| 25,447 | 3. Postage & Telephone | 15,607 | | 2,800 | 1. Entrance Fees (New Members) | 2,300 | |
| 10,644 | 4. Travelling Expenses | 29,124 | | 708,200 | 2. Annual Subscription | 933,084 | |
| 3,921 | 5. Bank Commission | 3,922 | | 44,608 | 3. Other Receipts | - | |
| 49,953 | 6. Meeting & Functions Expenses | 44,023 | | 1,021,000 | 4. Waste Dispo.Pass (Dumping Charges) | 1,448,100 | |
| 9,315 | 7. Office Expenses | 36,207 | | 35,000 | 5. Member List Soft copy | 35,000 | |

| 2020-21 | EXPENDITURE | 2021-22 | | 2020-21 | INCOME | 2021-22 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Amount | | Amount | Amount | Amount | | Amount | Amount |
| 12,500 | 8. Consultation Charges/ Accounting Charges | 48,500 | | - | 6.Projector Rent | 848 | |
| 24,000 | 9. Sanugrah Anudan Jadhav's family | 24,000 | | 100,000 | 7. AGM Sponsership | 72,248 | |
| 42,734 | 10. Sanugrah Anudan Anil Chopade | 314,354 | | 2 | 8. Round Off | - | |
| 25,700 | 11.Subscripation | 700 | | | 9. Sublating charges Received from ESIC | 16,726 | |
| 38,327 | 12. Other Expenses (MCCIA Fees + Trust ETC Fees) | 10,661 | | | | | |
| 5,000 | 13.Advertisement Expenses | 53,595 | | **5,508,457** | **SMAK ITI** | | **5,831,051** |
| 142,675 | 14.Smak Bhavan Expenses | 169,570 | | 3,694,825 | 1. Tuition Fee | 3,860,950 | |
| 51,636 | 15.Seminar EXP | - | | 1,458,342 | 2. Devlopment Charges | 1,572,331 | |
| - | 16.Computer Maintenance Charges | 3,600 | | 74,547 | 3. CNC Course Fees | 317,100 | |
| 191,582 | 17.Foundry Sand Exp. | 81,850 | | 85,743 | 4. Training Receipt | 57,862 | |
| 12,753 | 18. Website Exp | - | | 195,000 | 5. PLC Training ( Draftsman Mech.) | - | |
| 200,145 | 19. AGM Exp. | 207,056 | | - | 6. Reimbursement Charges | 22,808 | |
| 32,000 | 20. Tree Plantation Exp | 66,975 | | | | | |
| 2,295 | 21. Other Exp (ITI) | - | | | | | |
| 10,922 | 22. Insurance Exp | 11,118 | | | | | |
| - | 23. Grampanchayat Tax | - | | | | | |
| 300,311 | 24. Covid - 19 Exp | 320,108 | | | | | |
| 219,000 | 25. Night Petroling (Security Charges) | 117,306 | | | | | |
| | 26. ESI Subleting charges | 45,787 | | | | | |
| | | | | | | | |
| **2,124,268** | **( E ) DEPRECIATION** | | **2,129,045** | | | | |
| 1,495,071 | 1. Building @ 5% | 1,570,511 | | | | | |
| 94,817 | 2. Furniture & Fixture @10% | 99,258 | | | | | |
| 3,740 | 3. Library Books @25% | 5,168 | | | | | |
| 205,511 | 4. Electric Fitting @25% | 160,945 | | | | | |
| 82,566 | 5. Tools & Equipments @10% | 73,956 | | | | | |
| 112,016 | 6. Machinery @10% | 100,815 | | | | | |
| 68,704 | 7. Computer @10% | 62,734 | | | | | |
| 21,383 | 8. Motor Vehicle @ 10% | 19,245 | | | | | |
| 16,742 | 9. Fire Equipmetns @ 10% | 15,067 | | | | | |

| 2020-21 | EXPENDITURE | 2021-22 | | 2020-21 | INCOME | 2021-22 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Amount | | Amount | Amount | Amount | | Amount | Amount |
| 23,718 | 10. Tree Plantation Thibak 10% | 21,346 | | | | | |
| | | | | | | | |
| **4,788,056** | **(F) EXPENDITURE ON OBJECTS OF THE TRUST** | | **5,607,285** | | **BY DEFICIT DURING THE YEAR** | | **75,724** |
| | **EDUCATIONAL EXPENSES** | | | | **TRANSFERD TO BALANCE SHEET** | | |
| 4,066,220 | 1.Training Teachers Salary | 4,604,644 | | | | | |
| 353,889 | 2.Training Teachers Provident Fund | 296,859 | | | | | |
| - | 3.Training Teachers Bonus | - | | | | | |
| 40,122 | 4.Training Material Expenses | 113,838 | | | | | |
| 295,799 | 5.Educational Establishment Expenses | 514,484 | | | | | |
| - | 7.Students Training & Welfair exp. | 37,712 | | | | | |
| 32,026 | 8.Repairs & Maintenance Expenses | 39,748 | | | | | |
| | | | | | | | |
| 556 | **TO SURPLUS DURING THE YEAR** | | | | | | |
| | **TRANSFERD TO BALANCE SHEET** | | | | | | |
| | | | | | | | |
| **10,080,049** | **Total Rs.** | - | **10,874,266** | **10,080,049** | **Total Rs.** | - | **10,874,266** |

D.Y. Bhumkar & Co. - Chartered Accountant

M.Y. Patil, Vice President

Deepak Patil, President

Shiroli Manufacturer's Association, Kolhapur

# BALANCE SHEET AS ON THE YEAR 2021-2022

| 20-21 | FUNDS & LIABILITIES | 21-22 | | 20-21 | PROPERTY & ASSTS | 21-22 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| AMOUNT | | AMOUNT | AMOUNT | AMOUNT | | AMOUNT | AMOUNT |
| | | | | | | | |
| | **TRUST FUND OR CORPUS** | | | | **IMMOVABLE PROPERTY** | | |
| | | | | **84,225** | LAND-LEASE HOLD | | **84,225** |
| | **OTHER EARMARKED FUNDS** | | | | | | |
| 21,844,809 | **1. BUILDING FUND** | | **22,814,810** | | **BUILDING** | | **29,839,700** |
| | Opening Balance | 21,844,809 | | **27,381,880** | Opening Balance | **28,406,347** | |
| | Add.:- Flood Relief used for ESI Building work | 970,001 | | 25,000 | Add : Smak | 1,396,621 | |
| | | | | 2,494,538 | Add : During the Year Smak ITI New Buiding | 1,607,243 | |
| **200,000** | **2. STAFF WELFARE FUND** | **200,000** | **200,000** | 29,901,418 | **Total Rs.** | 31,410,211 | |
| | | | | 1,495,071 | Less: Depreciation @ 5% | 1,570,511 | |
| | **LIABILITIES** | | | | | | |
| **2,105** | **1. CONTINGENCY FUND** | **2,105** | **2,105** | **1,526,109** | **INVESTMENTS** | | **11,059,806** |
| | | | | | SMAK Group Gratuity (IDBI Bank, Kolhapur) | 426,106 | |
| **1,251,943** | **2. OTHER LIABILITIES** | | **10,556,713** | | SMAK Bank Of Baroda FD | 10,633,700 | |
| 70,000 | Smak Inner Circle | 93,819 | | | | | |
| 128,000 | Election Deposit | 128,000 | | | **1. FURNITURE AND FIXTURE** | | **893,317** |
| 78,442 | Duties and Taxes | 244,129 | | | | | |
| 4,000 | Bulletin add Advt. | 4,000 | | 931,812 | Opening Balance | 853,351 | |
| 1,500 | S.Creditors | - | | 16,356 | Add : Purchase during the year | 64,224 | |
| 970,001 | Flood Relief Collection (2019) | - | | | Add : Purchase ITI | 75,000 | |
| - | Smak Recreation Club | 86,765 | | 948,168 | **Total Rs.** | 992,575 | |
| - | Deposit from Kolhapur Foundry Cluster | 10,000,000 | | 94,817 | Less : Depreciation @ 10% | 99,258 | |
| | | | | | | | |
| **203,456** | **Group Gratuity Fund Int.** | | **203,456** | | **2.COMPUTER** | | **564,605** |
| | | | | **678,907** | Opening Balance | 618,339 | |
| **1,515,000** | **3. RENT DEPOSIT** | | **1,515,000** | | Add : ITI | 9,000 | |
| 75,000 | 1.Shri Mahalaxmi Marketing | 75,000 | | | Add : Purchase Smak | - | |
| 120,000 | 2.Vakratund Enterprises | 120,000 | | 8,136 | Add : Software | - | |
| 800,000 | 3.Shri Mahalaxmi Marketing | 800,000 | | 687,043 | **Total Rs.** | 627,339 | |
| 400,000 | 4.Atharv Tooling | 400,000 | | 68,704 | Less : Depreciation @ 10% | 62,734 | |
| 45,000 | 5.Datta Tools | 45,000 | | | | | |
| 20,000 | 6.Nexus Cutting Solution | 20,000 | | | **3.LIBRARY BOOKS** | | **15,505** |

| 20-21 | FUNDS & LIABILITIES | 21-22 | | 20-21 | PROPERTY & ASSTS | 21-22 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| AMOUNT | | AMOUNT | AMOUNT | AMOUNT | | AMOUNT | AMOUNT |
| 25,000 | 7. Precision Cutting Tools | 25,000 | | 14,960 | Opening Balance | 11,220 | |
| 30,000 | 8. Worth Enterprises | 30,000 | | | Add : Purchase during the year | 9,453 | |
| | | | | 14,960 | **Total Rs.** | 20,673 | |
| | | | | 3,740 | Less : Depreciation @ 25% | 5,168 | |
| | | | | | | | |
| | | | | 213,464 | **4.TREE Plantation Thibak** | | **192,118** |
| | | | | | Opening Balance | 213,464 | |
| | | | | 237,182 | **Total Rs.** | 213,464 | |
| | | | | 23,718 | Less : Depreciation @ 10% | 21,346 | |
| | | | | | | | |
| | | | | | **5.ELECTRIC FITTING** | | **482,833** |
| | | | | 791,704 | Opening Balance | 616,532 | |
| | | | | 23,839 | Add : During the year Smak | - | |
| | | | | 6,500 | Add : ITI | 27,246 | |
| | | | | 822,043 | **Total Rs.** | 643,778 | |
| | | | | 205,511 | Less : Depreciation @ 25% | 160,945 | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | **150,673** | **6. FIRE EQUIPMENTS** | | **135,606** |
| | | | | - | Opening Balance | 150,673 | |
| | | | | - | Add : During the year Smak | - | |
| | | | | 167,415 | **Total Rs.** | 150,673 | |
| | | | | 16,742 | Less : Depreciation @ 10% | 15,067 | |
| | | | | | | | |
| | | | | | **7.TOOLS AND EQUIPMENTS** | | **665,603** |
| | | | | 825,657 | Opening Balance | 743,091 | |
| | | | | - | Less During the year | -3,532 | |
| | | | | 825,657 | **Total Rs.** | 739,559 | |
| | | | | 82,566 | Less Depreciation @ 10% | 73,956 | |
| | | | | | | | |
| | | | | | **8.MACHINERY** | | **907,331** |
| | | | | **1,112,573** | Opening Balance | 1,008,146 | |
| | | | | 7,589 | Add : During the year Smak | - | |
| | | | | 1,120,162 | **Total Rs.** | 1,008,146 | |
| | | | | 112,016 | Less : Depreciation @ 10% | 100,815 | |

| 20-21 | FUNDS & LIABILITIES | 21-22 | | 20-21 | PROPERTY & ASSTS | 21-22 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| AMOUNT | | AMOUNT | AMOUNT | AMOUNT | | AMOUNT | AMOUNT |
| | | | | | | | |
| | | | | | **9.MOTOR VEHICLE** | | **173,202** |
| | | | | 213,830 | Opening Balance | 192,447 | |
| | | | | | **Total Rs.** | 192,447 | |
| | | | | 21,383 | Less: Depreciation @ 10% | 19,245 | |
| | | | | | | | |
| | | | | | **ADVANCES & DEPOSIT** | | **487,533** |
| | | | | 83,426 | MSEB + MIDC + Telephone | 83,426 | |
| | | | | 2,680 | MIDC | 2,680 | |
| | | | | 49,475 | MSEB | 49,475 | |
| | | | | | Add : ITI Staff Salary Adv (Suraj patil) | 6,000 | |
| | | | | 24,000 | Salary Advance Sandip Vir | - | |
| | | | | 13,000 | Salary Advance A.Y.Chopade | - | |
| | | | | 282,728 | Sundry Dr. | 334,137 | |
| | | | | 17,794 | TDS | 9,816 | |
| | | | | 1,999 | Telephone | 1,999 | |
| | | | | | | | |
| | | | | **1,432,784** | **CASH AND BANK BALANCES** | | **1,029,494** |
| | | | | 3,890 | Cash In hand ITI | 5,048 | |
| | | | | 3,052 | Cash In hand SMAK | 8,408 | |
| | | | | 25,912 | State Bank Of India, MIDC Kolhapur - 0707 | 7,323 | |
| | | | | 240,028 | IDBI Bank MIDC, Kolhapur - 7308 | 557,176 | |
| | | | | 524,055 | IDBI Bank MIDC, Kolhapur - 7313 | 7,486 | |
| | | | | 103,199 | Kolhapur Urban Bank MIDC Kolhapur - 0069 | 171,610 | |
| | **INCOME AND EXPENDITURE** | | | 3,843 | IDBI - Smak Trustee MIDC Kolhapur - 0657 | 4,002 | |
| | **ACCOUNT : SURPLUS** | | **11,238,794** | 528,805 | Bank Of Baroda Nagaon Kolhapur - 0975 | 233,293 | |
| **11,571,417** | Opening Balance | 11,314,518 | | | IDBI Bank ITI A/c. 4248 | 35,148 | |
| 1,146,104 | Add Surplus During The Year trfd from Income | -75,724 | | | | | |
| | & Expenditure A/c | | | 202,899 | | | |
| | | | | | | | |
| - | **Total Rs.** | - | **46,530,878** | - | **Total Rs.** | - | **46,530,878** |

D.Y. Bhumkar & Co. - Chartered Accountant M.Y. Patil, Vice President Deepak Patil, President

# Shiroli Manufacturer's Association, Kolhapur
## ESTIMATE FOR YEAR : 2022-23

| RECEIPT Particulars | Estimate 2021-22 | Receipt 2021-22 | Estimate 2022-23 | Particulars | Estimate 2021-22 | Expenses 2021-22 | Extra Exp. | Less Exp. | Estimate 2022-23 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Membership Fees | 3000.00 | 2300.00 | 3000.00 | Smak Staff Salaries | 595000.00 | 513360.00 | - | 81640.00 | 600000.00 |
| Annual Subscription | 910000.00 | 933000.00 | 1000000.00 | Training Teacher Salary | 5200000.00 | 4604644.00 | - | 595356.00 | 5500000.00 |
| Bank Interest | 400000.00 | 66925.00 | 475000.00 | Printing / Stationery | 56000.00 | 68968.00 | 12968.00 | | 75000.00 |
| Other Receipt | 66000.00 | 0.00 | 0.00 | Postage / Telephone | 29000.00 | 15605.76 | - | 13394.24 | 20000.00 |
| Shop Rent | 650000.00 | 567268.00 | 650000.00 | Travelling Expences | 13500.00 | 29124.90 | 15625.00 | | 32000.00 |
| Educational Fees | 5000000.00 | 3860950.00 | 6000000.00 | Audit Expences | 10000.00 | 10000.00 | - | 0.00 | 22000.00 |
| Training Receipt | 100000.00 | 57862.00 | 75000.00 | Annual Sub. Fees | 30000.00 | 700.00 | - | 29300.00 | 33000.00 |
| Donation | 1550000.00 | 1293251.00 | 1550000.00 | Bank Commission | 5000.00 | 3920.47 | | 1079.53 | 5000.00 |
| C.N.C Course Fees | 550000.00 | 317100.00 | 500000.00 | Light Bill | 180000.00 | 151718.19 | - | 28281.81 | 180000.00 |
| Development Charges | 2355000.00 | 1572331.33 | 3000000.00 | Office Expences | 12000.00 | 36206.00 | 24206.00 | | 40000.00 |
| Foundry Waste Charges | 1375000.00 | 1448100.00 | 1600000.00 | Grampanchayat Tax | 26000.00 | 0.00 | - | 26000.00 | 26000.00 |
| Reimbusement | 400000.00 | 22808.00 | 50000.00 | Function / AGM | 220000.00 | 207056.00 | - | 12944.00 | 240000.00 |
| Hall Rent | 50000.00 | 34491.00 | 50000.00 | Provident Fund | 500000.00 | 310997.00 | - | 189003.00 | 620000.00 |
| AGM Sponsorship | 150000.00 | 72248.00 | 150000.00 | Training Material | 150000.00 | 113838.00 | - | 36162.00 | 200000.00 |
| Member List Soft Copy | 40000.00 | 35000.00 | 40000.00 | Repairy Maintenance | 200000.00 | 143183.32 | - | 56816.68 | 220000.00 |
| | | | | Bonus | 35000.00 | 43127.00 | 8127.00 | | 50000.00 |
| | | | | Water Bill | 20000.00 | 68719.00 | 48719.00 | | 70000.00 |
| | | | | Other Expences | 50000.00 | | - | 50000.00 | 55000.00 |
| | | | | Building Construction | 2150000.00 | 2519538.00 | 369538.00 | | 1000000.00 |
| | | | | Tools and Equip. (New Trade) | 50000.00 | 0.00 | - | 50000.00 | 2000000.00 |
| | | | | Donation / Help | 25000.00 | 0.00 | - | 25000.00 | 27500.00 |
| | | | | Training Expences | 500000.00 | 295799.00 | - | 204201.00 | 400000.00 |
| | | | | Furniture & Fixture | 100000.00 | 16356.00 | - | 83644.00 | 120000.00 |
| **BY DEFECIENCY DURING YEAR** | **5317500.00** | | **4592500.00** | Smak Bhavan Exp & (Tree Plantation) | 195000.00 | 174675.00 | - | 20325.00 | 75000.00 |
| | | | | Advertising Expences | 15000.00 | 61095.00 | 46095.00 | | 25000.00 |
| | | | | Foundry Sand Expences | 200000.00 | 81850.00 | - | 118150.00 | 50000.00 |
| | | | | Covid Expences | 350000.00 | 320108.00 | | 29892.00 | 0.00 |
| | | | | Machinery (New Trade) | 8000000.00 | | - | 8000000.00 | 8000000.00 |
| | | | | Electric Fitting | 0.00 | 0.00 | - | | 50000.00 |
| | **18916500.00** | **10283634.33** | **19735500.00** | | **18916500.00** | **9790588.64** | **300311.00** | **9651189.26** | **19735500.00** |

D.Y. Bhumkar & Co. - Chartered Accountant

M.Y. Patil, Vice President

Deepak Patil, President

SMAK
SHIROLI MANUFACTURERS ASSOCIATION, KOLHAPUR

# शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर

## निमंत्रित सदस्य


**श्री. नरेंद्र झांवर**
श्रीराम फाउंड्री लि.


**श्री. बी. एम. सोमैया**
सोमैया टेक्नो प्रॉडक्ट्स


**श्री. जयराज वसा**
रॉकेट इंजिनिअरिंग प्रा. लि.


**श्री. विजय पाटील**
आर. आर. इंडस्ट्रीज


**श्री. रविकुमार केलगीनमठ**
केलसन इंजिनिअर्स


**श्री. नामदेव पाटील**
हिंद गिअर


**श्री. आय. ए. पाटील**
अॅड्रॉईट इंजिनिअर्स


**श्री. अविनाश चिकनीस**
अविसन इंडस्ट्रीज


**श्री. प्रवीण पटेल**
करवीर स्विच गिअर प्रा. लि.


**श्री. शेखर कुसाळे**
मिनर्व्हा एंटरप्राइजेस


**श्री. बदाम पाटील**
श्री शुभम टर्निंग सेंटर


**श्री. भीमराव खाडे**
रेणुका इंडस्ट्रीज


**श्री. आर. बी. वारनूळकर**
अॅरोव्हील इंडस्ट्रीज


**श्री. वीरेंद्र पाटील**
श्री स्पेरोटेक् प्रा. लि.


**श्री. राजेंद्र चौगुले**
आर. जी. मशिनिंग



**श्री. प्रताप मोदी**
परफेक्ट पिन्स


**श्री. मिलिंद पाटील**
सनमिल टेक्नॉलॉजीस


**श्री. वीजेंद्र चरणे**
विजेंद्र इंडस्ट्रीज


**अॅड. अशोक उपाध्ये**
कायदा सल्लागार


**श्री. विनायक गायकवाड**
कर सल्लागार


**श्री. विनायक आगाशे**
कर सल्लागार